सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ५९ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि. २४ मार्च २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## अखेर पोलिसांनी प्रशांत कोरटकरच्या मुसक्या आवळल्या, तेलंगणातून अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई**

आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी देणाऱ्या, तथा छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकरला पोलिसांनी अटक केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. प्रशांत कोरटकर हा दुबईत पळून गेल्याची चर्चा होती. पण पोलिसांनी तेलंगणातून त्याच्या मुसक्या आवळल्याची मोठी बातमी सूत्रांनी दिली आहे. प्रशांत कोरटकर गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. तो फरार होता. त्याने इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी कॉल रेकॉर्डिंगमधील आवाज आपल्या नसल्याचा दावा केला होता. विशेष म्हणजे तो माध्यमांसमोर येऊन आपण निर्दोष असल्याचं सांगत होता. यानंतर त्याने कोर्टातही धाव घेतली होती.



प्रशांत कोरटकरला सुरुवातीला कोर्टाकडून अटकेपासून संरक्षण मिळालं होतं. त्याला दोनवेळा अटकेपासून संरक्षण मिळालं. कोल्हापूर पोलिसांनी कोर्टात सातत्याने कोरटकरच्या अटकेची मागणी केली होती. कोरटकरने आपला मोबाईल पोलिसांकडे सुपूर्द केला होता. पण मोबाईलमध्ये संपूर्ण डेटा डिलीट करुन त्याने पोलिसांकडे मोबाईल सुपूर्द केल्याची माहिती समोर आली होती. यानंतर कोर्टाने प्रशांत कोरटकर याचा जामीन अर्ज फेटाळला होता. पण तोपर्यंत उशिर झाला होता. प्रशांत कोरटकर हा फरार झाला होता. कोल्हापूर पोलिसांकडून त्याचा युद्ध पातळीवर शोध सुरु होता. पण तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

**प्रशांत कोरटकरवर आता काय कारवाई होणार?**

इंद्रजित सावंत यांची कोर्टात बाजू मांडणारे वकील असीम सरोदे यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. प्रशांत कोरटकरला खूप आधीच अटक होण्याची आवश्यकता होती. त्याला अटक न केल्यामुळे सरकारबद्दल आणि पोलिसांबद्दल व्यापक गैरसमज पसरला होता. सरकार त्याला लपवून ठेवत आहे का? अशी शंका उपस्थित केली जात होती. त्याच्या जामीन अर्जाला सातत्याने विरोध केल्यानंतर आज त्याला अटक झाली आहे. आनंदाची गोष्ट आहे, अशी पहिली प्रतिक्रिया असीम सरोदे यांनी दिली.

प्रशांत कोरटकरला महाराष्ट्र पोलिसांनी ताब्यात घेतलं असेल तर त्याला कोल्हापूर पोलिसांच्या ताब्यात द्यावं लागेल. कोल्हापूर पोलीस त्याला न्यायालयात हजर करतील. त्यानंतर कोल्हापूरच्या न्यायालयात सर्व कार्यवाही होईल. प्रशांत कोरटकरला जामीनासाठी फ्रेश अर्ज करावा लागेल. त्याचा परत जामीन अर्ज रिजेक्ट झाला तर त्याचा मुक्काम काही दिवस कारागृहात राहील, अशी माहिती वकील असीम सरोदे यांनी दिली.

## सरकारने खासदारांना दिले मोठं गिफ्ट

### पगार, पेन्शनसह डीए त केली वाढ, आता नेमकी किती मिळणार पगार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ नवी दिल्ली**

केंद्र सरकारने खासदारांना मोठं गिफ्ट दिलं आहे. खासदारांच्या पगारात मोठी वाढ केली आहे. त्याचबरोबर दैनंदिन भत्ता आणि निवृत्ती वेतनात देखील वाढ केली आहे. याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. संसदीय कामकाज मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ही सुधारित वेतनश्रेणी १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार आहे. महागाई लक्षात घेऊन केंद्र सरकारने सभासद वेतन, भत्ते आणि निवृत्ती वेतन कायदा, १९५४ अंतर्गत वेतन आणि पेन्शनमध्ये सुधारणा केली आहे.




**खासदारांचे मासिक वेतन किती?**

दरम्यान, पूर्वीच्या पगारापेक्षा आता खासदारांच्या पगारात मोठी वाढ झाली आहे. खासदारांचे मासिक वेतन पूर्वी १,००,००० रुपये होते. आता ते वाढवून १,२४,००० रुपये प्रति महिना करण्यात आले आहे. त्याच वेळी, दैनिक भत्ता २,००० रुपयांवरुन २,५०० रुपये करण्यात आला आहे. माजी खासदारांचे मासिक पेन्शन २५,००० रुपयांवरुन ३१,००० रुपये करण्यात आली आहे. ५ वर्षांहून अधिक सेवेसाठी अतिरिक्त पेन्शन, जी पूर्वी २,००० रुपये प्रति महिना होते, ते देखील बदलले आहे, आता ते २,५०० रुपये प्रति महिना केले आहे.

## नागपूर दंगलीमधील मुख्य आरोपी फहीम खानला मोठा धक्का, पालिकेने घरावर चालवला बुलडोझर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

गेल्या आठवड्यात नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीदरम्यान झालेल्या तोडफोड आणि जाळपोळीमध्ये मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी कडक कारवाई करत अनेक संशयितांची धरपकड केली होती. तसेच या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या फहीम खान यालाही बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. आता नागपूर महानगरपालिकेने मोठी कारवाई करत फहीम खान याच्या घरावर बुलडोझर चालवला आहे. फहीम खान याच्या नागपूरमधील यशोधरानगर येथील संजयबाग कॉलनीत असलेल्या घरावर ही कारवाई करण्यात आली आहे.


नागपूर दंगलीमधील मुख्य आरोपी असलेल्या फहीम खानने घरामध्ये अनधिकृत बांधकाम केल्याची माहिती समोर आली होती. फहीम खान याच्या घरामध्ये सुमारे ९०० चौरस फुटांचे बांधकाम अनधिकृत असल्याची बाब समोर आली. नागपूर महानगरपालिकेने त्याला तत्काळ नोटीस बजावली होती. तसेच त्याच्या घरीदेखील एक प्रत दिली. हे अतिक्रमण तातडीने पाडण्याची कारवाई करण्याचे निर्देश वरिष्ठ पातळीवरून आले दरम्यान, आज सकाळी फहीम खान याच्या घरावर तोडक करावाई करण्यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी बुलडोझर आणि इतर सामानासह हजर झाले. तसेच फहीम खान याच्या घरावर बुलडोझरने कारवाई करण्यात आली. यावेळी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

दरम्यान, सोमवारी महाल, हंसापुरी परिसरात झालेल्या जाळपोळ व दगडफेकीच्या घटनेनंतर मायनॉरिटी डेमोक्रेटिक पार्टी शहराध्यक्ष फहीम खान शमीम खानला अटक करण्यात आली होती. औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मुद्द्यावरून रविवारी सकाळच्या सुमारास महालच्या शिवाजी पुतळा परिसरात आंदोलन झाले होते. या आंदोलनानंतर फहीम खानने षडयंत्र रचून जमावाच्या भावना भडकाविल्या व त्यातून जाळपोळ सुरू झाल्याच्या त्याच्यावर ठपका आहे. त्याच्याविरोधात देशद्रोहाचादेखील गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## वाघ्या कुत्र्याची समाधी रायगडावरुन हटवा, ३१ मे पर्यंत; संभाजीराजेंचं मुख्यमंत्र्यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ रायगड**

ऐतिहासिक संदर्भ नसलेल्या, पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी रायगड किल्ल्यावरुन हटवण्यात यावी अशी मागणी माजी खासदार आणि रायगड विकास प्राधिकारणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. तसं एक पत्रच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलं आहे.



हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत कथित वाघ्या कुत्र्याची समाधी म्हणून एक संरचना काही दशकांपूर्वी उभारण्यात आलेली आहे. सदर वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख अथवा संदर्भ मिळत नाही. भारतीय पुरातत्व विभागाने देखील सदर समाधी संरचना व वाघ्या कुत्र्याचे ऐतिहासिक महत्त्व यांबाबत त्यांच्याकडे कोणतीही ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नसल्याची स्पष्टोक्ती दिलेली आहे.

**कपोलकल्पित समाधी उभारण्यात आली हे महाराष्ट्राचं दुर्दैव**

समस्त भारतवासीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव, श्रद्धेची कुचेष्टा व महान युगप्रवर्तक श्री छत्रपती शिवाजी महाराजांची घोर प्रतारणा आहे. कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व नसलेली सदरील वाघ्या कुत्रा समाधी नामक संरचना हे दुर्गराज रायगडवरील अतिक्रमण असून राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ३१ मे २०२५ अखेरीपर्यंत सदरील अतिक्रमण श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळावरून व दुर्गराज रायगड वरून कायमस्वरूपी हटविण्यात यावे, याकरिता मुख्यमंत्री महोदयांकडे पत्र लिहून मागणी केली.

## कोण गद्दार हे सिद्ध झालंय, कुणाल कामरा प्रकरणात मुख्यमंत्री यांची प्रतिक्रिया

### कोण खुद्दार आणि कोण गद्दार आहे हे जनतेने दाखवल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

कोण गद्दार हे सिद्ध झालंय अशी प्रतिक्रिया कुणाल कामरा प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते.

माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोण खुद्दार आणि कोण गद्दार आहे हे जनतेने दाखवल आहे. अश्याप्रकारे अनादर करण्याचा कोणालाही अधिकार नाही. संविधानाने सांगितलं आहे स्वातंत्र्याचा स्वराचार करता येणार नाही. कामरा याने माफी मागितली पाहिजे. माजी मुख्यमंत्री आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अपमान करण्याचा काम केलं हे चुकीचा आहे.



स्टँडअप कॉमेडी अशी कॉमेडी करू शकत नाही. व्यंग करण्याचा अधिकार आहे. जाणून अपमानित केले जात असेल. बदनामी करत असेल तर त्याला सहन केला जाणार. त्यावर कारवाई केली जाईल असं माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

सध्या एकनाथ शिंदे विरोधातील गाण्यावरुन नवीन वाद निर्माण झाला आहे. स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात गाणं म्हटलं आहे. त्यानंतर कुणाल कामराविरोधात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलिसांकडून कुणाल कामराचे लोकेशन शोधण्याचे काम सुरु असल्याची माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली आहे.

तर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील कुणाल कामरावर कारवाई करण्याची माहिती दिल्याने आता कामराच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या समोर आलेल्या माहितीनुसार, काल रात्रीपासुन कुणाल कामरा याचा फोन बंद असून तो महाराष्ट्राच्या बाहेर आहे.

## शिवसेना फुटीनंतर पहिल्यांदाच ठाकरे-शिंदे आमने-सामने; उपमुख्यमंत्री येताच आदित्य यांचा स्वॅग, तोंड फिरवलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई**

विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून काही दिवसांपूर्वी विधिमंडळात शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आमने-सामने आले होते. त्यावेळी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उद्धव ठाकरेंनी संवाद साधला. मात्र, एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरेंनी एकमेकांकडे पाहिलेही नव्हते. त्यानंतर, आता पहिल्यांदाच आमदार आदित्य ठाकरे आणि एकनाथ शिंदे विधानसभा सभागृहात एका बैठकीसाठी एकत्र आल्याचे पाहायला मिळालं. या बैठकीत एकनाथ शिंदेंची एंट्री होतानाचा व्हिडिओ समोर आला आहे. त्यामध्ये, एकनाथ शिंदेंची बैठकीसाठी एंट्री होताच सभागृहातील सर्वजण उठून आदर दर्शवतात. मात्र, आदित्य ठाकरे उठून उभे राहत नाहीत. सध्या हा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे.




मुंबईच्या रस्ते कामांबाबत विधानसभा अध्यक्षांनी बोलावलेल्या आयोजित बैठकीला सुरुवात झाली असून मुंबईतील लोकप्रतिनधी व वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित आहेत. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अद्याप बैठकीस उपस्थित राहिले नव्हते. अखेर, विधानसभेतील उपमुख्यमंत्री कार्यालयातील आपलं कामकाज झाल्यानंतर ते बैठकीला उपस्थित राहिले. मात्र, तत्पूर्वीच शिवसेना उबाठा पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे या बैठकीला उपस्थित होते. अध्यक्षांनी बैठकीला सुरुवातही केली होती. दरम्यान, एकनाथ शिंदेंची उशीरा या बैठकीला एंट्री झाली. त्यामुळे, पक्षफुटीनंतर प्रथमच ठाकरे आणि शिंदे एका बैठकीच्या निमित्ताने एकमेकांसमोर आल्याचे पाहायला मिळाले.

एकनाथ शिंदेंची या बैठकीसाठी एंट्री होताच सभागृहातील अनेक नेतेमंडळी उठून उभी राहिली. मात्र, आदित्य ठाकरे आपल्या खुर्चीवरच बसून राहिले. त्यामुळे, अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे आदित्य ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना पाहून आपलं तोंड फिरवल्याचंही व्हिडिओत दिसून येत आहे. मुंबई रस्ते बांधकामात घोटाळा झाल्याचा आरोप आदित्य ठाकरेंनी केला होता. त्यानंतर, एकनाथ शिंदे आणि आदित्य ठाकरे पहिल्यांदाच आमने-सामने आल्याचं पाहायला मिळालं.

## मोहम्मद पैगंबर यांच्याबद्दल अपमानास्पद टिप्पणीचं समर्थन करणाऱ्या एकनाथ शिंदेंना, इम्तियाज जलील यांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई**

प्रसिद्ध स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक कवितेच्या माध्यमातून टीका केली होती. त्यानंतर शिवसेनेचे (शिंदे) कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत. शिवसेना कार्यकर्त्यांनी ठाणे व मुंबईत अनेक ठिकाणी निदर्शने केली, कुणाल कामराचे पोस्टर्स जाळले. शिंदेंचे समर्थक एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी थेट मुंबईतील खार रोड येथील युनिकॉन्टिनेन्टल हॉटेलवर हल्ला केला. या हॉटेलमधील द हॅबिटॅट या स्टुडिओमध्ये कुणाल कामरा याचा कार्यक्रम झाला होता. शिंदे समर्थकांनी या स्टुडिओची तोडफोड केली आहे.

शिवसेना कार्यकर्त्यांनी स्टुडिओमधील खुर्च्या तोडल्या, बल्ब व इतर वीजेच्या उपकरणांची मोडतोड केली. तसेच तिथल्या मंचाची नासधूस केली. दरम्यान, या दोन्ही घटनांवर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार व एआयएमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी या घटनेवरून एकनाथ शिंदेंवर व शिवसेना कार्यकर्त्यांवर संताप व्यक्त केला आहे.

## संपादकीय ......

# 'सीबीएससी'च्या दिशेने

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएससी) हे भारतातील सार्वजनिक आणि खासगी शाळांसाठीचे राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण मंडळ आहे. १९२९ मध्ये स्थापन झालेले हे मंडळ म्हणजे माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रातील आंतरराज्यीय एकात्मता आणि सहकार्याचा एक प्रयोगच होता. भारतातील २७ हजारहून अधिक शाळा आणि २८ परकीय देशांमधील २४० शाळा 'सीबीएससी'शी संलग्न आहेत. या सर्व शाळा नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (एनसीईआरटी) अभ्यासक्रमाचे पालन करतात. सर्व केंद्रीय विद्यालये, जवाहर नवोदय विद्यालये, खासगी शाळा आणि केंद्र सरकारने मान्यता दिलेल्या बहुतेक शाळा या सीबीएससीशी संलग्न आहेत. सीबीएससी दरवर्षी फेब्रुवारी व मार्चमध्ये दहावी व बारावीच्या अंतिम परीक्षा घेते. हे बोर्ड पूर्वी महाविद्यालयांमध्ये अभियांत्रिकी आणि आर्किटेक्चरमधील पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एआयईईई परीक्षा घेत असे. तथापि २०१३ मध्ये आयआयटी-संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) मध्ये विलीन करण्यात आली. २०१४ मध्ये 'नेट'ची भर पडल्यानंतर, सीबीएससी ही जगातील सर्वात मोठी परीक्षा घेणारी संस्था बनली. आता महाराष्ट्रातील राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांना आगामी शैक्षणिक वर्षापासून सीबीएससी अभ्यासक्रम लागू करण्यासंबंधीच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून राज्य मंडळाच्या शाळांच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात येणार आहे.

आता पहिल्या टप्प्यात पहिल्या इयत्तेला हा अभ्यासक्रम लागू होईल व पुढील शैक्षणिक वर्षापासून तो दुसरी, तिसरी व चौथीसाठी लागू केला जाईल, अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केली आहे. खरे तर राज्य मंडळाच्या शाळांना सीबीएससी अभ्यासक्रम कधीपासून लागू करायचा, यावर मतभेद आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, राज्य मंडळाच्या तिसरी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सीबीएससी अभ्यासक्रमाचा आराखडा लागू करण्याबाबत सुकाणू समितीने मान्यता दिल्याचे अंशतःच खरे असल्याची माहिती भुसे यांनी दिली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शालेय शिक्षण विभागाच्या अधिकार्यांशी चर्चा केली आहे. त्यानंतरच आता यंदाच्या वर्षी केवळ पहिलीच्या वर्गापासूनच अंमलबजावणी करण्याचा निर्णय झाला असून, तो राज्यातील सर्व शाळांना बंधनकारक असल्याचे भुसे यांनी म्हटले आहे. त्याचवेळी दुसरीकडे सीबीएससी बोर्डाच्या नवीन नियमानुसार, दहावीच्या विद्यार्थ्यांना वर्षातून दोनदा बोर्डाच्या परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. या केंद्रीय बोर्डाने नववी व दहावीच्या अभ्यासक्रमात बदलही केले आहेत. याशिवाय बोर्ड परीक्षा घेण्याचा कालावधी आणि काही विषयांमध्ये द्विस्तरीय अभ्यासक्रमाचा पर्याय देणे, यासारख्या मुद्द्यांचा समावेशही या नवीन नियमांत असणार आहे. दोन बोर्डांच्या परीक्षांमध्ये एक अंतरिम परीक्षाही होणार आहे.

नवीन नियमानुसार, नववी व दहावीच्या विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे या विषयांमध्ये दुहेरी पर्यायी अभ्यासक्रम लागू करण्यास बोर्डाच्या नियामक मंडळाने मंजुरी दिली आहे. विद्यार्थ्यांना या विषयांमध्ये दोन काठिण्यपातळींची निवड करता येईल. नववी व दहावीत शिकणारे विद्यार्थी या विषयांसाठी स्टँडर्ड आणि ॲडव्हान्स्ड यातून पर्याय निवडतील. या बदलामुळे विद्यार्थ्यांना पुढच्या प्रवेशपरीक्षांसाठी चांगली तयारी करता येईल, असा युक्तिवाद करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थी आणि पालकांमध्ये सीबीएससीचे आकर्षण वाढले असून, या शाळांची आणि तेथील विद्यार्थ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या शाळांचे अभ्यासक्रम देशपातळीवरील असल्याने, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षाही याच अभ्यासक्रमांवर आधारलेल्या असतात. त्यामुळे या परीक्षांतील यशाकरिता ते उपयोगी ठरतात, हे नाकारता येणार नाही. मुंबई महानगरपालिकेच्या आता 'मुंबई पब्लिक स्कूल' नावाने ओळखल्या जाणार्या बर्याच शाळा गेली काही वर्षे सीबीएससी अभ्यासक्रमच शिकवत आहेत. शहराच्या प्रत्येक विभागात (वॉर्ड) किमान एक तरी सीबीएससी शाळा असण्यावर महानगरपालिकेचा कटाक्ष आहे. शिक्षणाच्या केंद्रीकरणामुळे राज्य शालांत मंडळाचे महत्त्व यामुळे कमी होणार असल्याची टीका केली जात आहे. अर्थात अभ्यासक्रमात संपूर्ण बदल होणार नसून, सीबीएससी अभ्यासक्रम ७० टक्के आणि राज्य बोर्डाचा अभ्यासक्रम ३० टक्के असे प्रमाण यात राहणार आहे. भाषा आणि स्थानिक इतिहासाचा अभ्यासक्रम राज्य बोर्डाचा असणार आहे.

पण खरा प्रश्न हा केवळ अभ्यासक्रमाचा नसून, शैक्षणिक दर्जा उंचावण्याचा, शाळांमधील सुविधा वाढवण्याचा आणि शिक्षणसंस्थांची स्वायत्तता टिकवण्याचा आहे. महाराष्ट्रात शिक्षकांपासून ते शिक्षणाधिकार्यांपर्यंत आणि शिक्षण मंडळापासून ते पाठ्यपुस्तक मंडळापर्यंत विविध संस्थांमधील तज्ज्ञ अधिकार्यांच्या बहुतांश जागा रिक्त आहेत. त्या न भरता, केवळ केंद्रीय अभ्यासक्रम लागू केल्यामुळे गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थी स्पर्धा परीक्षांत तळपतील, हा केवळ गैरसमज आहे. तसेच सीबीएससीच्या शाळांत प्रामुख्याने ज्यांची आर्थिक परिस्थिती बरी आहे, अशा पालकांची मुले तेथे जातात. उलट राज्य मंडळाच्या शाळांत सर्व समाजघटकांतील मुले असतात. सामाजिक, आर्थिक कमकुवत घटकांत शिक्षणाच्या महत्त्वाबाबत जागरूकता येत असली, तरी त्यांच्याकडील साधने अल्प असतात. सीबीएससीचा अभ्यासक्रम हा चांगला आणि एसएससीचा मात्र तेवढा बरा नाही, हे समीकरण अनेकांच्या डोक्यात घुसले असून, त्यालाही बरीच वर्षे लोटली आहेत. पण, दोन्हींचे अभ्यासक्रम पूर्णतः समान असूच शकत नाहीत. कारण त्या त्या राज्यांचा प्रादेशिक इतिहास व भूगोल शिकवणे आवश्यकच असते. भाषेच्या शिक्षणातही प्रादेशिक लेखक व त्यांची लेखनशैली यांना महत्त्व असते. म्हणजे या अभ्यासक्रमात केंद्र व राज्यस्तरांवर फरक असणारच. सीबीएससीसाठी अभ्यासक्रम तयार करणार्या एनसीईआरटी या संस्थेच्या धर्तीवर राज्यात 'एससीईआरटी' ही संस्था अस्तित्वात आहे. विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांच्या आकलनाचा विचार करून तसेच प्रादेशिकतेचे घटक गृहीत धरून, या संस्था अभ्यासक्रम तयार करत असतात. सीबीएससीच्या धर्तीवर राज्यात अभ्यासक्रम तयार करण्याचा विचार करतानाच, बालभारती, एनसीईआरटी आणि एसएससी बोर्ड यासारख्या सर्व संस्था अधिक सक्षम करण्याचा विचार महाराष्ट्र शासनाने करण्याची गरज आहे.

# महानगरपालिकेतर्फे शहरी आरोग्य केंद्र आयसोलेशन येथे भव्य प्राथमिक आरोग्य शिबिर

## आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिली भव्य आरोग्य शिबिराला भेट



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२४अमरावती-** महानगरपालिका अंतर्गत शहरी आरोग्य केंद्र आयसोलेशन अमरावती येथे राज्य शासनाच्या क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यक्रमासाठी शंभर दिवसाच्या कृती आराखड्याच्या अंतर्गत मा. आयुक्त मनपा अमरावती यांच्या मान्यतेने प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये मनपाचे स्थायी /अस्थाई व कंत्राटी कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यामध्ये CBC, LFT, KFT, THROID FUNCTION TEST, LIPID PROFILE, C-LCIUM² TEST, R-F-CTOR, HB-1C, M-LE CE- FEM-LE C-125, BP, Am{U SUG-R इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. त्याचबरोबर क्षयरोग तपासणी अंतर्गत एक्स-रे व थुंकी तपासणी करण्यात आली. सदर दिक्षा फाउंडेशन द्वारा संचालित फिरते नेत्र चिकित्सक यांनी आलेल्या कर्मचाऱ्यांचे डोळे तपासणी करून दिली. तेव्हा मोठ्या संख्येने मनपा कर्मचारी यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिराला महानगरपालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे आणि अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी भेट देऊन संपूर्ण शिबिराची पाहणी करून माहिती घेतली. या भेटी दरम्यान महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, मुख्यलेखापरीक्षक शामसुंदर देव, शिक्षणाधिकारी डॉक्टर प्रकाश मेश्राम, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर विशाल काळे, सहायक आयुक्त भूषण पुसतकर यांनी स्वतः आरोग्य तपासणी केली तसेच शिबीर यशस्वी करण्याकरिता वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. फिरोज खान, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पाठबागे,स्त्री वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी खडसे, वैद्यकीय अधिकारी डॉ. देवेंद्र गुल्हाने व इतर सर्व कर्मचारी यांनी अथक परीश्रम घेऊन सदर आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी पणे पार पाडले.

रविवार दिनांक २३/०३/२०२५ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० या वेळेत मनपा दवाखाना आयसोलेशन, दसरा मैदान जवळ, बडनेरा रोड, अमरावती येथे सर्व मनपा कर्मचारी स्थायी, अस्थायी, कंत्राटी व बाह्य संस्था यांचे प्राथमिक आरोग्य तपासणी बाबत भव्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व कर्मचाऱ्यांनी सदर आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभाग महानगरपालिका अमरावती यांनी केले आहे.-

# भुईमुगाची मुळं सडली अन् खोडावर पांढरी बुरशी आलीय; कशी रोखणार? वाचा सविस्तर

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

गरिबांचा बदाम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भुईमुगाची उन्हाळी हंगामातील पेरणी पूर्ण होत आली आहे. पेरणी करताना बियाणांची व जमिनीची निवड योग्य नसेल व बीजप्रक्रिया करण्याकडे काटेकोर लक्ष दिले नसेल तर हे पीक पांढरी बुरशी, मूळकुज, खोडकुज आदी बुरशीजन्य रोगांना बळी पडण्याची शक्यता आहे.

भुईमुगाची मुळं सडली अन् खोडावर पांढरी बुरशी आलीय; कशी रोखणार? वाचा सविस्तर

भुईमूग हे खरीप व उन्हाळी हंगामात घेतले जाणारे महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. महाराष्ट्रात खरीप हंगामात जवळपास दोन लाख हेक्टर तर उन्हाळी हंगामात एक लाख हेक्टर क्षेत्रावर भुईमुगाचे पीक घेतले जाते.

गहू काढल्यानंतर अथवा ऊस गेल्यानंतर उन्हाळी भुईमुगाच्या लागवडीकडे शेतकरी वळतो. इतर पिकाच्या तुलनेत १०० ते १२५ दिवसात अधिकचे पैसे मिळवून देणाऱ्या भुईमुगाची लागवड करताना सुयोग्य व्यवस्थापन केले तर उत्तम आर्थिक फायदा होतो. त्यासाठी बियाणांची व जमिनीची निवड, बीजप्रक्रिया या महत्त्वाच्या बाबी आहेत.

पानं पिवळी, झाड सडते

खोडकुज हा स्क्लेरोटियम रॉल्फ्सी या बुरशीमुळे होणारा रोग आहे. त्याच्या प्रादुर्भावामुळे जमिनीलगतच्या खोडावर पांढऱ्या रंगाचा बुरशीसारखा थर तयार होतो.

मुळकुज या रोगाचा प्रादुर्भाव रायझोक्टोनिया सोलानी व फुसेरियम एसपीपी या बुरशीमुळे होतो.

मुळं कुजतायत, खोडं सडतायत!

भुईमुगासाठी मध्यम भुसभुशीत निचरा होणारी, अधिकचा ओलावा न धरणारी, भरपूर सेंद्रीय पदार्थ असणारी जमीन लागते. हलक्या व निकृष्ट जमिनीवर पीक घेतले. जादा ओलावा धरणारी जमीन असली तर बुरशीजन्य रोगांना निमंत्रण मिळते. पांढरी बुरशी, मूळकुज, खोडकुज या रोगांनी भुईमूग पोखरला जातो.




ट्रायकोडर्मा ह्या जैविक बुरशीचा वापर करू शकता.

पेरणीआधी बीजप्रक्रिया करणे अत्यावश्यक

पेरणीपूर्वी बियाणास थायरम किंवा कार्बेन्डाझिम अथवा मॅन्कोझेब या बुरशीनाशकांची बीजप्रक्रिया करावी. प्रतिकिलो बियाणास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक चोळावे. त्यामुळे बियांमार्फत पसरणाऱ्या रोगांना आळा बसतो.




# वाकी रायपूर ते पूर्णा नगर मार्गावर ट्रकला भीषण आग

## सुदैवाने जीवितहानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ भातकुली**

वाकी रायपूर ते पूर्णा नगर मार्गावर कुटार घेऊन जाणाऱ्या ट्रकला शॉक सर्किट मुळे भीषण आग लागल्याची धक्कादाय घटना २३मार्च रोजी दुपारी ३ वाजता सुमारास उघडकीस आली, सेफिन खा आवेश खा रा खोलापूर असे ट्रक चालकाचे नाव आहे. ट्रक चालकाच्या समय सूचकतेमुळे मोठा अनर्थ तळला ट्रक चालकाने रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका शेतामध्ये पेटलेला अवस्थेत ट्रक नेऊन उभा केला त्यामुळे जवळ असलेल्या वाकी रायपूर गावात आगीचा धोका निर्माण होत असल्याचे नागरिकांच्या लक्षात येत असल्यास त्यांनी तात्काळ आग विझवण्यासाठी धडपड केली,घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आसेगाव पोलीस दाखल अग्निशामक दल अचलपूर नगरपरिषद , अमरावती महानगरपालिका अग्निशामक दल यांना प्राचारण करण्यात आले, आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले,

या आगीमध्ये कुटार सामागरीसह पाच लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवल्या जात आहे.घटनेचा पुढील तपास आसेगाव पोलीस करीत आहे-




## कोलेस्टेरॉल एवढंच घातक असतं शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढणं, ते नियंत्रित ठेवायचं तर

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

कोलेस्टेरॉलबाबत आता बऱ्याच प्रमाणात लोक जागरुक झालेले आहेत. पण त्याच्या एवढंच घातक ठरू शकणारं ट्रायग्लिसराईडही नियंत्रित असायला हवं यासाठी खूपच कमी लोक प्रयत्न करताना दिसतात.



कोलेस्टेरॉल एवढंच घातक असतं शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढणं, डॉक्टर सांगतात ते नियंत्रित ठेवायचं तर..

शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढलं तर रक्तप्रवाह सुरळीत होत नाही. त्यामुळे हार्ट अटॅकचा धोका वाढत जातो म्हणूनच डॉ. सलीम जैदी यांनी याविषयी माहिती देणारी पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली असून यांनी ट्रायग्लिसराईड नियंत्रित ठेवण्यासाठी काय करावे, याविषयीची माहिती दिली आहे.

कोलेस्टेरॉल एवढंच घातक असतं शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढणं, डॉक्टर सांगतात ते नियंत्रित ठेवायचं तर....०३ / ०७

डॉक्टर सांगतात की तुमच्या आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर तुम्हाला मधुमेह होण्याप्रमाणेच शरीरातील ट्रायग्लिसराईड वाढण्याचा धोकाही असतो. त्यामुळे गोड पदार्थ, कोल्ड्रिंग, पॅकेज फूड यांपासून शक्य तितकं लांब राहा.

कोलेस्टेरॉल एवढंच घातक असतं शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढणं, डॉक्टर सांगतात ते नियंत्रित ठेवायचं तर

तळलेले पदार्थ तसेच जंक फूड खाण्याचं प्रमाण कमी करा. कारण त्यामुळेही शरीरातले ट्रायग्लिसराईड वाढू शकते.

कोलेस्टेरॉल एवढंच घातक असतं शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढणं, डॉक्टर सांगतात ते नियंत्रित ठेवायचं तर..

जा लोकांना अल्कोहोल जास्त प्रमाणात घेण्याची सवय असते त्या लोकांच्या लिव्हरवर परिणाम होतो आणि लिव्हर खराब झाल्यामुळे त्यांच्या शरीरातले ट्रायग्लिसराईड वाढू शकते.

कोलेस्टेरॉल एवढंच घातक असतं शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढणं, डॉक्टर सांगतात ते नियंत्रित ठेवायचं तर...

ज्या लोकांच्या शारीरिक हालचाली खूपच कमी असतात त्या लोकांनाही ट्रायग्लिसराईड वाढण्याचा धोका असतो.

कोलेस्टेरॉल एवढंच घातक असतं शरीरातलं ट्रायग्लिसराईड वाढणं, डॉक्टर सांगतात ते नियंत्रित ठेवायचं तर


ट्रायग्लिसराईड नियंत्रित ठेवण्यासाठी नियमितपणे फळं, भाज्या, ओट्स, अक्रोड यासारखे पदार्थ खावेत. तसेच दररोज ३० मिनिटे तरी कोणता ना कोणता व्यायाम करावा.

# जिल्ह्यामध्ये घरकुलाच्या यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांचे होणार सर्वेक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतीक्षा यादीत समाविष्ट न झालेले, परंतु सद्य:स्थितीत पात्र असलेल्या कुटुंबांना तसेच बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना घरकुलाचा लाभदेण्यासाठी जिल्ह्यात पुन्हा एकदा सर्वेक्षण केले जात आहे. जि. प.च्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत १ ते ३० एप्रिल दरम्यान हे सर्वेक्षण गावस्तरावर ग्रामसेवकांकडून केले जाणार आहे. त्यामुळे आता घरकुलाच्या यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांना घरकुल मिळण्याची आशा पल्लवीत झाली आहे.

जिल्ह्यात घरकुलासाठी २०१८ मध्ये सर्वेक्षण केले होते. यात मोठ्या प्रमाणात लाभार्थी समाविष्ट झाले असले तरी बहुतांश लाभार्थी पात्र असताना सुटल्याचीही ओरड झाली. दरम्यान, कित्येक लाभार्थ्यांनी घरकुलाची मागणी केली. परंतु, त्यांचे नाव यादीत नसल्याने त्यांना घरकुल देणे प्रशासनाकडून अशक्य होते. त्यामुळे वंचित लाभार्थ्यांमध्ये रोष व्यक्त होत असताना शासनाकडून यंदा प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत सुमारे ५६ हजारांवर घरकुल मंजूर झाले. या धर्तीवर यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांना देखील लाभदेण्याकरिता अशा पात्र लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करून त्यांना यादीत समाविष्ट केले जात आहे. गावस्तरावर ग्रामसेवक हे सर्वेक्षण करतील. ग्रामसेवकांनासर्वेक्षणाबाबत माहिती व प्रशिक्षण देण्याकरिता जिल्हा स्तरावरून स्थापत्य अभियंता, डेटा एंट्री ऑपरेटर या ४२ कर्मचाऱ्यांना सीईओ संजिता महापात्र व प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षण देत मास्टर ट्रेनर करण्यात आले आहे. या वेळी सहायक प्रकल्प संचालक टी. बी. चव्हाण, कनिष्ठ अभियंता प्रतिक सांगोलकर, विभागीय प्रोग्रामर मौसिम अली व जिल्हा प्रोग्रामर भूषण उमक आदींची उपस्थिती होती. ग्रामसेवकांच्या प्रशिक्षणानंतर १ ते ३० एप्रिल दरम्यान ग्रामसेवक वंचित व यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करतील. या उपक्रमामुळे आता यादीतून सुटलेल्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कुणाचे होणार सर्वेक्षण :हे सर्वेक्षण फक्त बेघर, कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणअंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार केलेल्या प्रतीक्षा यादीत समाविष्ट न झालेले परंतु सध्या पात्र असलेले कुटुंब, निकषात अपात्र परंतु सद्यःस्थितीत पात्र असलेल्या कुटुंबांचे सर्वेक्षण होणार आहे.



RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २४ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# अखेर नागपूर 'कर्फ्यू'मुक्त, सहा दिवसांनी बाजारपेठा सुरू, नागरिक आणि व्यापाऱ्यांना मोठा दिलासा



### अनेक दुकाने, बाजारपेठा सुरु

कर्फ्यूमुळे या परिसरांमधील बाजारपेठा बंद होत्या व त्यामुळे व्यापाऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. कर्फ्यू दूर होताच अनेक दुकानदारांनी लगेच दुकाने उघडली. तर काही बाजारपेठांदेखील लहानमोठ्या प्रमाणात सुरू झाल्याचे दिसून आले.

### सुरक्षायंत्रणांसमोर मोठे आव्हान

दरम्यान, संवेदनशील भागात पोलिसांची सुरक्षा कायम राहणार आहे. इतर ठिकाणी पोलीस गस्तीवर राहणार आहेत. प्रस्थापित झालेली शांतता कायम राखून शहरात सद्भाव वाढविण्याचे मोठे आव्हान पोलीस यंत्रणेसमोर आहे.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नागपूर–** १७ मार्च ला झालेल्या हिंसाचारानंतर खबरदारीचा उपाय म्हणून ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कर्फ्यू लावण्यात आला होता.

सर्व भागात शांतता प्रस्थापित करण्यात पोलिसांना यश आले. तसेच सणासुदीचे दिवस लक्षात घेता व्यापाऱ्यांचेदेखील नुकसान होऊ नये अशी मागणी समोर येत होती. पोलिसांनी एकूण स्थितीचा आढावा घेत तहसील, कोतवाली, गणेशपेठ व यशोधरानगरमधील कर्फ्यू मागे घेतला आहे. शहर 'कर्फ्यू'मुक्त झाले असले तरी अनेक ठिकाणी सुरक्षाव्यवस्था मात्र तैनात राहणार आहे.

कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने शहरातील ११ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत कर्फ्यू लावण्यात आला होता. यात सक्करदरा, तहसील, कोतवाली, गणेशपेठ, यशोधरानगर, नंदनवन, इमामवाडा, शांतीनगर, लकडगंज, पाचपावली, कपिलनगर या पोलीस ठाण्यांचा प्रामुख्याने समावेश होता. मात्र, गुरुवारी सकाळी पोलिसांनी नंदनवन व कपिलनगरमधील कर्फ्यू हटविला, तर सहा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दुपारी दोन ते चार या कालावधीत शिथिलता दिली होती. मात्र रात्री सक्करदरा, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, इमामवाडा, सक्करदरा व यशोधरानगर येथील शिथिलता रद्द केली. शांतता प्रस्थापित झाल्याने संवेदनशील जागा वगळता इतर ठिकाणचा कर्फ्यू उठवावा अशी मागणी समोर आली होती.

शनिवारी पोलिसांनी सक्करदरा, इमामवाडा, पाचपावली, शांतीनगर आणि लकडगंजमधील नागरिकांना दिलासा देत तेथील कर्फ्यू हटविला होता.

रविवारी परत एकदा पूर्ण स्थितीचा आढावा घेण्यात आला व पोलीस आयुक्तांनी कोतवाली, तहसील, गणेशपेठ व यशोधरानगरमधील कर्फ्यूदेखील हटविण्याचे निर्देश दिले.

दुपारी तीन वाजतापासून कर्फ्यू दूर झाला.

# अमरावती, बडनेरावासीयांना आता ७४ उन्हाळी विशेष रेल्वेचा लाभ

## प्रवाशांसाठी सुविधा, महानगरांकडे जाण्यासाठी जादा पर्याय



### पुणे–नागपूरसाठी १२, नागपूर–पुणेसाठी १२ फेऱ्या

गाडी क्र. ०११४६९ साप्ताहिक अति जलद वातानुकुलित विशेष रेल्वे ८ एप्रिल ते २४ जून दरम्यान धावणार असून, ही दर मंगळवारी दु.३.५० वाजता पुण्याहून सुटेल. त्यानंतर नागपूर येथे दुसऱ्या दिवशी स. ६.३० वाजता नागपुरात पुरात पोहोचेल. गाडी क्र. ०१४७० साप्ताहिक अति जलद वातानुकुलित विशेष ट्रेन ९ एप्रिल ते २५ जून या कालावधीत नागपूर येथून दर बुधवारी सकाळी ८ वाजता सुटेल आणि पुणे येथे त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पोहोचेल.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती–** उन्हाळी सुट्या सुरू होत असून प्रवाशांची वाढती संख्या, अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने मुंबई–नागपूर, पुणे–नागपूर ७४ विशेष रेल्वे सेवा चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अमरावती, बडनेरावासीयांना मुंबई, पुणे या महानगरांकडे जाणे–येणे करण्यासाठी जास्तीचे पर्याय व सुविधा उपलब्ध झाली आहे.अमरावती जिल्ह्यातील मोठ्या संख्येत चाकरमाने, विद्यार्थी, नोकरपेशा व्यक्ती मोठ्या संख्येत मुंबई, पुण्याला राहतात. त्यांच्यासाठी उन्हाळी विशेष रेल्वेची सुविधा उपयोगी ठरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई मुंबई ते नागपूर आणि पुणे ते नागपूर यादरम्यान मध्य रेल्वेने नियमित गाड्यांशिवाय ७४ अतिरिक्त फेऱ्यांची सोय केली आहे. सीएसएमटी नागपूर–सीएसएमटी द्विसाप्ताहिक विशेष गाडी ५० फेऱ्या करणार आहे. गाडी क्र. ०२१३९ द्विसाप्ताहिक विशेष गाडी सीएसएमटी येथून ६ एप्रिल ते २९ जूनदरम्यान दर मंगळवारी व रविवारी रात्री १२.२० वाजता निघेल व नागपुरात त्याच दिवशी दु. ३.३० वाजता पोहोचेल. ही गाडी मुंबई–नागपूर २५ अशा फेऱ्या करणार आहे. गाडी क्र. ०२१४० द्विसाप्ताहिक विशेष गाडी ६ एप्रिल ते २९ जूनदरम्यान दर मंगळवार आणि रविवारी रात्री ८ वाजता नागपूर येथून निघेल आणि दुसऱ्या दिवशी दु. १.३० वाजता सीएसएमटी मुंबई येथे पोहोचेल. नागपूर–मुंबई उन्हाळी विशेष गाडी २५ फेऱ्याकरणार आहे.

एक द्वितीय वातानुकुलित, ५ तृतीय वातानुकूलित, १० शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन, अशी गाडीची संरचना असून दादर (फक्त ०२१३९ साठी), ठाणे, कल्याण, इगतपुरी (फक्त ०२१४० साठी), नाशिकरोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा हे थांबे घेणार आहे. 'वेळापत्रक पाहण्यासाठी ॒.शर्पीीळी॒.ळपवळरपीर ळश्र.सीं.ळप ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करावा लागेल.

# मेळघाट रंगोत्सवात पथनाट्य, लोकनृत्य, एकांकिकांमधून जनजागृती

## नागरिकांनी घेतला शासकीय सुविधांचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी यांच्या वतीने चिखलदरा येथे आज 'मेळघाट रंगोत्सव २०२५' उत्साहात पार पडला. या महोत्सवात स्थानिक कलाकारांनी पथनाट्य, लोकनृत्य आणि एकांकिकांमधून उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन जनजागृती केली. तसेच नागरिकांनी शासकीय सुविधांचा लाभ घेतला. यावेळी आमदार केवलराम काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, धारणीच्या उपविभागीय अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, तहसीलदार जीवन मोरनकर, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे आदी उपस्थित होते.







महोत्सवात लोकनृत्य, पाककला, पारंपरिक वेशभूषा स्पर्धा घेण्यात आल्या. लोकनृत्य स्पर्धेत प्रथम बिजूधावडी, ता. धारणी, द्वितीय ढाकणा, ता. चिखलदरा, तृतीय बेरदाबला तर प्रोत्साहनपर भिरोजा, ता. चिखलदरा आणि कोयलारी, ता. चिखलदरा, वेशभूषा स्पर्धेत प्रथम साबुलाल दहीकर आणि गीता दहीकर, रा. मोथा, द्वितीय सरिता मावसकर, रा. धारणी, तृतीय अनुसया पराते, रा. धोतरखेडा, पाककला स्पर्धेत प्रथम जासमू कासदेकर, रा. आळनदी, द्वितीय सुमन कासदेकर आणि प्रमिला कंदिलवार, तृतीय नगाय चिमोटे यांना स्मृतीचिन्ह आणि रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

नागरिकांसाठी आधार अपडेट, ॲग्रीस्टॅक नोंदणी, रेशनकार्ड नोंदणी, गोल्डन कार्ड नोंदणी, आरोग्य तपासणी, विनाशुल्क मौखिक तपासणी, पर्यटन विभाग, तहसील कार्यालयाच्या सेवा आणि पोस्ट ऑफिस व बँक खाते उघडण्याची सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घेतला.

# शहरातील सायन्सस्कोर मैदानात कचऱ्याचा ढीग

## नागरिक करतात दुर्गंधीचा सामना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** अमरावती मधील सायन्सस्कोर मैदानात कचरा साचला आहे.अमरावती शहराच्या मध्यभागी असलेल्या ऐतिहासिक सायन्स स्कोर मैदनात कचऱ्याचा ढीग साचलेला आहे. त्यामुळे येथे सकाळी, सायंकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. मैदान परिसरात दुर्गंधी, चालण्याच्या ट्रॅकवर कचरा येत असल्याने वयोवृद्ध व्यक्ती, महिला बालकांना चालण्यास त्रासदायक ठरत आहे.सध्या सायन्सकोर मैदानावर प्रदर्शनी भरविण्यात आली आहे त्यामुळे कचरा मोठ्या प्रमाणात आहे.संरक्षण भिंत



असूनही येथे कचरा साचतो कसा असा प्रश्न येथे येणाऱ्या नागरिकांनी उपस्थित केला आहे. बस स्थानक परिसरात जिल्हा परिषद अंतर्गत येणारे सर्वात मोठे, विस्तृत असे सायन्सस्कोर मैदान आहे. या ठिकाणी राजकीय सभा, विविध शासकीय कार्यक्रम, तसेच अन्य खाजगी कार्यक्रमांच्याआयोजनासाठी हे मैदान वापरण्यात येते. मात्र, यावेळी या मैदानाच्या स्वच्छतेचा प्रश्न उभा राहिला आहे. शहराच्या मध्यभागी तसेच बस स्थानक, रुग्णालय, शासकीय कार्यालय तसेच नागरी वस्ती या मैदानाला लागून आहे. त्यामुळे या ठिकाणी वर्दळ असते. कार्यक्रमाचे आयोजन झाल्यानंतर अनेकदा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याचे दिसते. यामुळे संपूर्ण मैदानावर कचऱ्याचे ढीग तयार होते. या मैदानावर खेळाडूंसह ज्येष्ठ नागरिक, महिला सकाळी आणि सायंकाळी फिरण्यासाठी येतात. त्यामुळे या नागरिकांना कचऱ्याच्या ढिगातून निघणारी दुर्गंधी, घाण ही चालण्याच्या ट्रॅकवर येत असल्याने समस्या निर्माण झाली आहे.

# अडत्याने ग्राहकाला परत केले जादा कमिशन अवास्तव आकारणीचा भांडाफोड, निबंधकांकडे करणार तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अंजनगाव–** सुर्जीस्थानिक बाजार समितीतील अडत्याकडून शेतमाल खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या कमिशनपेक्षा जादा रक्कम आकारल्याचा भांडाफोड कापूसतळणी येथील व्यक्तीने केला. या प्रकाराची तक्रार निबंधकांकडे करणार असल्याचे ते म्हणाले.

स्थानिक बाजार समितीमधील नीलेश ठाकरे यांच्या अडत दुकानातून कापूसतळणी येथील अरुण शेवाणे यांनी शनिवारी २५०० रुपये क्विंटल दराने चार क्विंटल गहू खरेदी केला.

अडत्याने गहू रक्कम १०,००० रुपये व इतर खर्च ४०० रुपये असे एकूण १०,४०० रुपयांची पावती दिली. शेवाणे यांनी अडत्याला १०,४०० रुपये चुकते केले. पावतीवरीलचारशे रुपये कमिशन खर्चाची विचारपूस केली असता,



घेतलेली रक्कम अडत्याने बरोबर असल्याचे सांगितले. परंतु, शेवाणे यांना संशय आल्याने त्यांनी ओळखीतील संचालक अमोल पोटे यांना फोन करून विचारणा केली.

कार्यालयात उपस्थित पोटे यांनी क्षणाचाही विलंब न लावता सचिव त्यांना घेऊन घटनास्थळी आले. हिशेबाने विचारणा करीत शेवाणे यांच्याकडून अडत्याने जास्त घेतलेले ५५ रुपये परत करण्यास सांगितले.


इतर ग्राहकांचे नुकसान होऊ नये म्हणून गहू खरेदीवरील अवास्तव कमिशनचा भांडाफोड केल्याचे अरुण शेवाणे यांनी स्पष्ट केले. धान्य खरेदीदारांकडून खर्चापोटी किती रुपये घ्यावे लागते, याबाबत बाजार समितीच्या सचिवाला पूर्णपणे दिसून आले.कमिशनमध्ये अडत, बाजार समिती सेस व हमाल–मापाईचे दर ठरले असताना, अवास्तव आकारणी कुणाच्या खात्यात, असा प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रकाराची निबंधकांकडे तक्रार करणार असल्याचे शेवाणे यांनी सांगितले.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांची 'कॉग्निझंट' कंपनी मध्ये निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** फोटो टेलीग्रामपी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांची 'कॉग्निझंट' या बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत निवड झाली. महाविद्यालयासाठी ही अभिमानाची बाब असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.या निवडीमध्ये संगणक अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन अशा विविध शाखांमधील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांची निवड कठीण निवड प्रक्रियेतून झाली असून त्यामध्ये लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत व मानव संसाधन मुलाखतीचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञानासोबतच संवाद कौशल्य आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्य व मेहनतीच्या जोरावर ही मोठी संधी प्राप्त केली आहे.

कंपनीची सर्व प्रक्रिया पार करत संगणक विभागातील आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकॉम्म्युनिकेशन इंजिनीरिंग, शिवराज कदम,पार्थ डांगरे, अत्रेय पोटे, प्रथमेश केदारे, जयेश देशमुख ,रुजल रहाटे ,अजय जाधव, मेधनकर थमके विद्यार्थ्यांची या कंपनीने निवड केली आहे.



कॉग्निझंट ही एक आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान (आयटी) सेवा आणि सल्लागार कंपनी आहे.कंपनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध सेवा पुरवते, जसे की सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डाटा नालिटिक्स, क्लाऊड सोल्युशन्स आणि सायबर सिक्युरिटी नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने व्यवसायांसाठी स्मार्ट सोल्युशन्स प्रदान करणे हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे. हेल्थकेअर, बँकिंग, फायनान्स आणि विमा क्षेत्रातील कंपन्यांना डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन करण्यास मदत करणारी ही एक प्रमुख कंपनी आहे. कंपनीचे जगभरात कार्यालये असून भारत, अमेरिका, युरोप आणि आशियातील अनेक देशांमध्ये तिची सेवा आहे. भारतात विशेषतः पुणे, चेन्नई, बंगलोर, हैदराबाद आणि गुरुग्राम येथे कंपनीची मोठी केंद्रे आहेत.महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलने विद्यार्थ्यांना या संधीसाठी योग्य मार्गदर्शन केले तसेच त्यांची विविध कौशल्य चाचणी घेत तयारी करून घेतल्याने विद्यार्थ्यांना सहज यश प्राप्त करता आले.

पी .आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक डॉ पी.एम. खोडके, पी .आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावांधिया, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर, कॉर्पोरेट रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड , संगणक विभागाचे विभाग प्रमुख डॉ विजय गडीचा, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभाग प्रमुख डॉ उमेश होरे, संगणक विभाग प्लेसमेंट को ऑर्डीनेटर प्रा. प्रतीक यावले, प्रा. योगेश शेलोकार, प्रा. दीपक धनवाणी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. अनिकेत पावडे यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी या संधीसाठी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन व प्राध्यापकांचे आभार मानले असून, त्यांनी भविष्यातही अधिक मेहनत घेऊन संस्थेचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या यशामुळे महाविद्यालयाचा प्लेसमेंट रेकॉर्ड अधिकच भक्कम झाला असून, भविष्यात आणखी मोठ्या कंपन्यांसोबत महाविद्यालयाने संधी निर्माण करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

# आमदार संजय खोडके यांचे स्वागत व सत्कार




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य आमदार संजय भाऊ खोडके यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला याप्रसंगी सत्कार करताना माननीय प्रवीण भाऊ पोटे पाटील (माजी पालक मंत्री अमरावती जिल्हा व शहराध्यक्ष भाजपा अमरावती )मा. चेतन पवार (माजी उपमहापौर तथा सरचिटणीस भाजपा अमरावती ) मा. नितीन भाऊ भेटाडू, अजय पाटील टवलारकर, एड. सुनील बोळे, संजय भाऊ बोबडे, राजूभाऊ चौधरी, जिल्हा बँकेचे संचालक अजय पाटील इत्यादी हजर होते.

# प्रशांत कोरटकरविरोधात राष्ट्रदोहाचा गुन्हा दाखल करा

## नागपूर राजघराण्यातील भोसलेंची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नागपूर** – इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना फोनवरून शिवीगाळ करत छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणारा प्रशांत कोरटकर फरारच आहे. त्याच्याविरोधात राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी राजे मुधोजी भोसले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले आहे.



कोरटकरविरोधात नागपूर, कोल्हापूर व जालना येथे गुन्हे दाखल झाले आहेत. न्यायालयाने अटकपूर्व जामीन दिल्यानंतरदेखील कोरटकर समोर आला नव्हता. आता त्याचा जामीन फेटाळल्यानंतर त्याला अटक करण्यासाठी कोल्हापूर येथील पोलिसांचे पथक नागपूरात पोहोचले. मात्र त्याच्या निवासस्थानी तो आढळला नाही. पोलीस पथकाने चंद्रपूर व मध्यप्रदेशमध्येदेखी त्याचा शोध घेतला. बेलतरोडी पोलिस ठाण्याच्या मदतीने त्याचा शोध सुरू आहे. नागपूर सायबर पोलिस ठाण्याचीदेखील मदत घेण्यात येत आहे. मुख्यमंत्र्यांनी ज्याला 'चिल्लर' म्हटले तो कोरटकर पोलिसांकडून पकडल्या जात नसल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर भोसले यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहीले आहे. कोरटकरला अटक होत नाही हे गृहविभागाचे अपयश आहे. महाराष्ट्रातील पोलिसांवर यामुळे मोठी नामुष्की ओढविली आहे. कोरटकरला सहकार्य करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करावा. तसेच कोरटकर विरोधात राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भोसले यांनी केली आहे.

# कापसाची आवक अडीच हजार क्विंटल; भाव रु. ७ हजार २५०



## हंगाम संपत आला तरी भाव वाढ नाहीच; शेतकरी चिंतेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**रब्बीतील प्रमुख पिकांमध्ये कापसाचा समावेश होतो. मात्र मागील दोन ते तीन वर्षांपासून कापसाचा दर समाधानकारक मिळत नसल्या मुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी उभ्या झाल्या आहेत. शासकीय कापूस खरेदीसुद्धा दिवास्वप्न ठरत आहे. दरम्यान आता भाववाढ होतच नसल्यामुळे शेतकरी कापूस विक्रीसाठी घेऊन येत आहेत. सध्या शहरातील खासगी बाजारात दिवसाला अडीच हजार क्विंटल कापसाची आवक सुरू असून, भाव ७ हजार २५० रुपयांपर्यंत मिळत आहे.जिल्ह्यात यंदा रब्बी हंगामात २ लाख ५५ हजार हेक्टर क्षेत्रात कापसाची पेरणी होती. जिल्ह्यात कापसाचे सरासरी उत्पादनजवळपास साडेदहा लाख क्विंटल होते. कापूस शेतकऱ्यांच्या अर्थचक्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे पीक आहे. परंतु भाक्च नसल्यामुळे शेतकऱ्यांचे अर्थचक्र कोलमडत आहे. दोन ते तीन वर्षांपूर्वी कापसाला प्रतिक्विंटल १३ हजार रुपयांपर्यंत भाव होता. त्यानंतरही साडेनऊ ते दहा हजार रुपये भाव मिळाला. मात्र मागील देन वर्षांपासून कापूस सात ते साडेसात हजारांच्या वर गेला नाही. कापसाची पेरणी ते वेचणीपर्यंत खर्च आणि मशागत खर्च लक्षात घेता कापूस विकणे या भावात परवडत नसल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले आहे. भाव वाढ न झाल्यास येणाऱ्या हंगामात जिल्ह्यातील कापसाच्या पेऱ्यात मोठ्या प्रमाणात घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सीबीएसई अभ्यासक्रमाबाबत गैरसमज दूर करणार- दादा भुसे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नाशिक** – शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सीबीएसई बोर्डाच्या धरतीवर शासकीय शाळांमध्ये अभ्यासक्रम राबविणार आहे. त्याबाबत असलेले गैरसमज दूर केले जातील. अधिवेशनातच त्याची सर्व माहिती दिली जाईल. त्यानंतर या अभ्यासक्रमाचे सर्वच स्तरात स्वागत होईल, असा दावा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या रविवारी (द. २३) नियोजीत नाशिक दौऱ्यासाठी आले असता ते माध्यमांशी बोलत होते.

दादा भुसे म्हणाले शासकीय शालांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी काही



धाडसी निर्णयांची गरज आहे. त्यासाठी शिक्षकांनाही प्रशिक्षण देण्यात येईल. शाळांमध्ये शिक्षकसंख्या कमी पडणार नाही याची काळजी घेण्यासाठी पुढील आठवड्यापासून शिक्षक भरती सुरू केली जाणार असल्याचेही भुसे म्हणाले. काही संस्थांना कागदपत्रांची पूर्तता करण्यास वेळ लागत असल्याने शिक्षक भरतीसाठी वेळ वाढवून दिल्याचे ते म्हणाले. सीबीएसई आले म्हणजे बालभारती स्टेट बोर्ड यांचे अस्तित्व संपेल असे काही नाही. त्यांच्या अभ्यासक्रमातील काही भाग आपण घेणार आहोत. आपला इतिहास आणि भूगोल आपण कायम ठेवणार आहोत. पालकांच्या माहितीसाठी येत्या दोन दिवसांत विधानसभेत त्याची संपूर्ण माहिती दिली जाईल. यंदाच्या वर्षी पहिलीसाठी हा अभ्यासक्रम सुरू करणार असून तीन वर्षांत १२ वीपर्यंत त्याचा विस्तार केला जाईल याचे नियोजन सुरू असल्याचेही दादा भुसे म्हणाले.

# शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात 'स्पंदन' वार्षिक स्नेहसंमेलन, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**

शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयात मंगळवार दि. १९ ते २१ मार्चला वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा 'स्पंदन २०२५' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या उदघाटनास्तव प्रमुख पाहुणे म्हणून लक्साकेम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. परेश राजा तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एन. एन. इनामदार उपस्थित होते. मा. परेश राजा यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून भविष्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या प्राचार्या डॉ.




एन. एन. इनामदार यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सर्वच स्पर्धेत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. प्रत्येकविद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त अशा कलागुणांना या स्नेहसंमेलनात वाव देण्यात आला.

त्यामध्ये गायन, नृत्य, नाटक, क्रीडा क्षेत्र व अन्य स्पर्धा या सर्वांना वाव देण्यासाठी हा कार्यक्रम सर्वोत्तम व्यासपीठ ठरले. त्याचा फायदा प्रत्येकांनी घेऊन आपल्या आयुष्यात स्वतःच्या सुप्त कलागुणांना प्राधान्य देऊन पुढे जायचे, हाच उद्देश स्पंदन २०२५ सोहळ्याने सर्वांना दिला. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या जिमखाना उपाध्यक्ष डॉ. एम. वाय. अग्रवाल यांनी प्रास्ताविक केले. सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक तसेच सर्वच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. या कार्यक्रमाला यशस्वी पार पाडण्यासाठी यश गायकवाड, आयुष पोटे, उन्नती निस्ताने, भूषण पारस्कर, वैष्णवी नाफडे, गार्गी दगवार यांनी अथक परिश्रम घेतले, तसेच कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मध्यप्रदेशात भीषण अपघात! महाराष्ट्रातील दोन महिला डॉक्टरांचा मृत्यू, कार पलटली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४शिवपुरी** मध्यप्रदेश मध्य प्रदेशच्या शिवपुरी जिल्ह्यात फोरलेन हायवेवर भीषण अपघात झाला. यामध्ये अर्टिगा कार पलटून कारमधील दोन महिला डॉक्टरांचा मृत्यू झाला आहे. तर अन्य चार डॉक्टर जखमी झाले आहेत.

हे सर्व डॉक्टर एकाच कारमधून तीर्थयात्रेसाठी निघाले होते. अयोध्येला जाऊन आल्यानंतर ते उज्जैन महाकालेश्वर मंदिराकडे जात होते. यावेळी लुकवासा पोलीस ठाणे क्षेत्रात शिवपुरी-गुना हायवेवर त्यांची कार अनियंत्रित झाली, यामुळे ती पलटी मारत



पुलावरून खाली कोसळली. दहा दिवसांपूर्वी हे सर्व डॉक्टर तिर्थयात्रेसाठी गेले होते.

डॉ. अतुल आचार्य हे कार चालवत होते. कवासा बायपासवर त्यांचे कारवरील नियंत्रन सुटले. अपघाताची माहिती मिळताच कोलारस पोलीस ठाण्याची मदत आली आणि जखमींना हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. डॉ. अतुल आचार्य हे भिवंडीचे असल्याचे सांगितले जात आहेत. सकाळी आठ वाजता हा अपघात झाला आहे.

जखमींमध्ये डॉ. उदय जोशी (६४) रा. दादर, डॉ. सुबोध पंडित (६२) रा. वसई, डॉ. अतुल आचार्य (५५) रा. भिवंडी आणि डॉ. सीमा जोशी (५९) यांचा समावेश आहे. तर मृतांमध्ये अतुल आचार्य यांची पत्नी डॉ. तन्वी आचार्य (५०) व सुबोध पंडित यांची पत्नी डॉ. नीलम पंडित (५५) यांचा मृत्यू झाला आहे. नीलम यांना हॉस्पिटलमध्ये नेत असताना मृत्यू झाला तर तन्वी यांचा जागेवरच मृत्यू झाला होता.

# फळांचा राजा ग्राहकांवर रुसला, यंदा खाणार भाव!

## हापूसचा हंगाम ४० दिवस, देशभरात आंबा कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४** नवी मुंबई : दरवर्षी फेब्रुवारी ते जून ५ महिने आंब्याचे फळबाजारावर वर्चस्व असते; परंतु यावर्षी खराब हवामानामुळे उत्पादनावर परिणाम झाला असून, आवक घटली आहे. यंदा कोकणच्या हापूसची सर्वाधिक आवक १ एप्रिल ते १० मे, अशी ४० दिवस राहणार आहे. गुजरात व दक्षिणेकडील राज्यांतही उत्पादन कमी झाल्याने यावर्षी ग्राहकांना कमी प्रमाणात आंबा उपलब्ध होणार असून, भावही तेजीत राहतील. गतवर्षी फेब्रुवारीपासून आंब्याची मोठी आवक सुरू झाली होती; परंतु यावर्षी फेब्रुवारीमध्ये गतवर्षीपेक्षा ५८३ टन कमी आवक झाली आहे. गतवर्षी मार्चच्या सुरुवातीला सरासरी ४० हजार पेट्यांची आवक होत होती. यावर्षी २० ते २५ हजार पेट्यांचीच आवक होत आहे.

यावर्षी १ एप्रिलपासून हापूस, बदामी, लालबाग, राजापुरी, केसरची आवक होईल, तर एप्रिलनंतर जुन्नर हापूसची आणि २५ जूननंतर दशेरी लंगडाची आवक होईल.



**प्रतिडझन हापूसचे दर**

| वर्ष | होलसेल | किरकोळ |
|---|---|---|
| २०२४ | २००-१,००० | ५००-१,५०० |
| २०२५ | ३००-१,४०० | ७००-२,००० |

गतवर्षी फेब्रुवारीपासून आंब्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली होती. यावर्षी खराब हवामानामुळे आवक घटली आहे. हापूसची सर्वाधिक आवक १ एप्रिल ते १० मेदरम्यान राहील. दक्षिणेतील आंब्याची आवकही कमी होण्याची शक्यता आहे.

–संजय पानसरे, संचालक

गुजरात व दक्षिणेकडील राज्यांतही उत्पादन कमी झाल्याने यावर्षी ग्राहकांना कमी प्रमाणात आंबा उपलब्ध होणार असून, भावही तेजीत राहतील. गतवर्षी फेब्रुवारीपासून आंब्याची मोठी आवक सुरू झाली होती; परंतु यावर्षी फेब्रुवारीमध्ये गतवर्षीपेक्षा ५८३ टन कमी आवक झाली आहे. गतवर्षी मार्चच्या सुरुवातीला सरासरी ४० हजार पेट्यांची आवक होत होती.

आवक ४० टक्क्यांनी कमी : आंध्र प्रदेश, कर्नाटक व केरळमध्ये उत्पादन कमी आहे. गुजरातमध्येही अशीच स्थिती आहे. यावर्षीचा हंगाम गतवर्षीपेक्षा ३० ते ४० टक्के कमी राहण्याची शक्यता आहे.यावर्षी १ एप्रिलपासून हापूस, बदामी, लालबाग, राजापुरी, केसरची आवक होईल, तर एप्रिलनंतर जुन्नर हापूसची आणि २५ जूननंतर दशेरी लंगडाची आवक होईल.

विदर्भ प्रजासत्ताक

# ‘रेल्वे’साठी अचलपुरात ‘रास्ता रोको’, ‘शकुंतला’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :**

ब्रिटिशकालीन शकुंतला रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करून या मार्गावर रेल्वेसेवा पुन्हा सुरू व्हावी, या मागणीसाठी रविवारी शहीद दिनी अचलपूर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शकुंतला रेल्वे बचाव समितीच्या वतीने अमरावती-बऱ्हाणपूर राज्य महामार्गावर अचलपुरातील चांदूर नाका येथे हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. ऐतिहासिक शकुंतला रेल्वे ही पूर्ववत सुरू व्हावी तसेच या रेल्वेचे नॅरोगेज वरून ब्रॉडगेज मध्ये रूपांतर व्हावे, ही जुनी मागणी आहे.




शकुंतला नॅरोगेज रेल्वे बंद होऊन तब्बल सात वर्षे झाली. ती पुन्हा सुरू करण्यासाठी अचलपूर, मुर्तिजापूर दरम्यान संघर्ष सुरू आहे. ही रेल्वे ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित झाली, तर हा संपूर्ण परिसर आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या अधिक विकसित होईल. या मागणीसाठी ३४ पेक्षा अधिक आंदोलने करण्यात आली असून, राष्ट्रपती, पंतप्रधान, रेल्वेमंत्री आणि राज्य सरकारकडे वारंवार निवेदने पाठवण्यात आली आहेत. मात्र, अजूनही शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. शांततेच्या मार्गाने सत्याग्रह करूनही सरकारने दुर्लक्ष केल्याने आता रास्ता रोको आंदोलन केले आहे, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.चांदूर नाक्यावर आंदोलन सुरु असताना तेथून अचलपूर चे आमदार प्रवीण तायडे यांचे वाहन जात असताना आंदोलकांनी आमदारांची गाडी थांबवून प्रवीण तायडे यांना शकुंतला रेल्वे लवकरात लवकर सुरु व्हावी, यासाठी निवेदन दिले. यावेळी आमदारांनी दिल्लीत जाऊन प्रत्यक्ष रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन तोडगा काढू, असे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले. यावेळी रेल्वे बचाव समितीचे सदस्य योगेश खानझोडे, गजानन कोल्हे, डॉ निलेश तारे, कचरूशेठ पटवारी, राजाभाऊ धर्माधिकारी, राजेश अग्रवाल, संजय डोंगरे, दीपा तायडे, दयाराम चंदेल, राजेंद्र पांडे, किरण गवई, एस.बी. बारखडे, विजय गोंडचवर, राजेंद्र जयस्वाल, वसंतराव धोबे, आदी उपस्थित होते.

# संतनगरी शेगावात दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न
## आक्षेपार्ह पोस्टप्रकरणी पाच युवकांना पोलीसांनी घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४बुलढाणा :**

सध्या महाराष्ट्रात मुघल शासक औरंगजेबाची कबर आणि त्यावरून मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्या नागपूर शहरात उसळलेल्या हिंसक दंगलीवरून राज्यातील सामाजिक, राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. आता या संवेदनशील प्रकरणावरून समाजविरोधी व्यक्तींनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट टाकून सामाजिक वातावरण कलुषित करण्याचा खोडसाळपणा केला जात आहे. याला विदर्भ पंढरी म्हणून प्रख्यात शेगाव नगरी सुद्धा अपवाद ठरली नाही! दंगलप्रकरणी सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर अपलोड करीत दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच युवकांना शेगाव पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

शेगांव पोलिसांनी सोहेल खान साहेब खान (२२, रा. अशपाक उल्ला चौक, शेगाव), नागेश श्रीकृष्ण कळसकार (२९, रा. व्यंकटेश नगर, शेगाव), मो. सलमान मो. लियाज (१९, रा. बाजार फैल), मो. उमर मो. शोएब (१८, रा. पुरुषोत्तम पाटील नगर, शेगाव), शुभम विठ्ठल ढगे (२९, रा. एसबीआय कॉलनी, शेगाव) यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. पोलीस हवालदार संजय करुटले यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम १२६,१३५(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर हजर केले जाणार आहे. पुढील तपास ठाणेदार पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार संजय करुटले करीत आहेत.

**तर जेलमध्ये जाल**

शेगाव पोलिसांनी नुसतीच कारवाई करून समाधान मानले नाहीये! ठाणेदार पाटील यांनी संत नगरी शेगावमधील मुख्य चौकात, संवेदनशील भागात यासंदर्भात जनजागृती अभियान सुरू केले. ठाणेदार आणि त्यांचे सहकारी ध्वनीवर्धकवरून प्रबोधन करीत आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या सोशल मिडीयावर आक्षेपार्ह मजकूर फॉरवर्ड किंवा अपलोड न करण्याचे आवाहन अभियानात करण्यात येत आहे. सोशल मीडियावर चिथावणीखोर किंवा दोन समाजात तेढ निर्माण करणारी पोस्ट अपलोड किंवा फॉरवर्ड केल्यास आपणासही जेलची हवा खावी लागणार, अशी तंबी देण्यात येत आहे. नागरिकांनी सोशल मिडीयाचा वापर करताना खबरदारी बाळगण्याचे आवाहन शहर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# फळांचा राजा ग्राहकांवर रुसला, यंदा खाणार भाव

## हापूसचा हंगाम ४० दिवस, देशभरात आंबा कमी

### प्रति डझन हापूसचे दर

| वर्ष | होलसेल | किरकोळ |
|---|---|---|
| २०२४ | २००-१,००० | ५००-१,५०० |
| २०२५ | ३००-१,४०० | ७००-२,००० |

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

दरवर्षी फेब्रुवारी ते जून ५ महिने आंब्याचे फळबाजारावर वर्चस्व असते; परंतु यावर्षी खराब हवामानामुळे उत्पादनावर परिणाम झाला असून, आवक घटली आहे. यंदा कोकणच्या हापूसची सर्वाधिक आवक १ एप्रिल ते १० मे, अशी ४० दिवस राहणार आहे.

गुजरात व दक्षिणेकडील राज्यांतही उत्पादन कमी झाल्याने यावर्षी ग्राहकांना कमी प्रमाणात आंबा उपलब्ध होणार असून, भावही तेजीत राहतील. गतवर्षी फेब्रुवारीपासून आंब्याची मोठी आवक सुरू झाली होती; परंतु यावर्षी फेब्रुवारीमध्ये गतवर्षीपेक्षा ५८३ टन कमी आवक झाली आहे. गतवर्षी मार्चच्या



सुरुवातीला सरासरी ४० हजार पेट्यांची आवक होत होती. यावर्षी २० ते २५ हजार पेट्यांचीच आवक होत आहे.

यावर्षी १ एप्रिलपासून हापूस, बदामी, लालबाग, राजापुरी, केसरची आवक होईल, तर एप्रिलनंतर जुन्नर हापूसची आणि २५ जूननंतर दशेरी लंगडाची आवक होईल.

गतवर्षी फेब्रुवारीपासून आंब्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली होती. यावर्षी खराब हवामानामुळे आवक घटली आहे. हापूसची सर्वाधिक आवक १ एप्रिल ते १० मेदरम्यान राहील. दक्षिणेतील आंब्याची आवकही कमी होण्याची शक्यता आहे.

# येनस सह नांदसावंगी सबस्टेशन मंजूर होऊनही कामाला सुरुवातच नाही

## भर उन्हाळ्यात वाढले तालुक्यात लोडशेडींग. वीज कधीही जाते आणि येते : पालकमंत्र्यांनी लक्ष देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर वीज वितरण कंपनीच्या ढेपाळलेल्या कारभाराने नांदगाव खंडेश्वर शहरासह ग्रामीण भागातील नागरिक आता चागलेच हैराण झाले आहेत.भर उन्हाळ्यात दिवसा आणि रात्री वीजपुरवठा केव्हाही खंडित होतो.तो तासन्तास सुरळीत होत नाही. दिवसा निरंतर विद्युत पुरवठा तासनतास जातो तर रात्रीच्या वेळी गेलेली लाईन तासनतास येतच नसल्याने नागरिकांना रात्रीला भर उन्हाळ्यात उकाड्यात झोपण्याची वेळ आलेली आहे सध्या उन्हाळा सुरू असल्याने नागरिक आधीच उकाड्याने हैराण झालेले आहेत. एकवेळ लाईन गेली तर तासनतास येण्याचे नावच घेत नाही आणि याबाबत नागरिकांनी विद्युत विभागाचे अधिकारी याना जर कॉल केला तर ते पण कधीच उचलत नाहीत कारण नांदगाव खंडेश्वर येथील विद्युत विभागाचा कोणताही अधिकारी आणि कर्मचारी हा मुख्यालयी राहत नसून ते अमरावती वरून दररोज अपडाऊन करतात या मुख्य कारणाने नांदगाव खंडेश्वर शहरासह ग्रामीण भागातील रात्रीच्या वेळी गुल झालेली वीज दुसऱ्या दिवशीच सुरू होते. सध्या कडकं उन्हाळा सुरू असल्याने दिवसा चटके झोंबतात, तर रात्री कानाजवळ डास गुणगुणतात. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नांदगाव




खंडेश्वर शहरातील बत्ती केव्हाही गुल होते तिचा काहीच वेळ नाही त्यामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. नांदगाव खंडेश्वर येथील वीज वितरण कंपनीच्या स्थानिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याने तालुक्यात विजेची समस्या गंभीर होत चालली आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यांतील विजेची साम्य दिवसेंदिवस अधिकाऱ्यांच्या कामचुकार पणामुळे बिकट होत असल्याचे दिसून येत आहे ही समस्या काही अंशी कमी व्हावी म्हणून मागील वर्षी विद्युत विभागाचेवतीने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील येनस आणि नांदसावगी या दोन गावामध्ये आर.डी.एस.एस.या योजनेअंतर्गत दोन विद्युत सबस्टेशन मंजूर करण्यात आले त्यावर निधीची पण उपलब्ध करून देण्यात आला सदर कामाचे टेंडर प्रक्रिया सुरू झाली पण गेल्या एक वर्षापासून या कामाला अधिकाऱ्यांच्या कामचुकार आणि अडेलतट्टू पणामुळे अद्यापही सुरुवातच करण्यात न आल्याने तालुक्यात विजेची समस्या बिकट झालेली असून विद्युत विभागाचे अधिकारी याकडे काही केल्या लक्ष द्यायला तयार नसल्याने सदर काम सुरू करण्याच्या दृष्टीने जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पालकमंत्री ना.चद्रशेखर बावनकुळे यांनी जातीने लक्ष देण्याची मागणी नांदगाव खंडेश्वर तालुका वासियानी केलेली आहे. याकडे या विभागाच्या आमदारांना सुद्धा लक्ष द्यायला वेळच असल्याचे दिसून येत आहे.त्यांनी जणू या तालुक्याला वाऱ्यावर सोडले असल्याचे त्यांच्या या कृतीवरून दिसून येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे? विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांची या तालुक्यात भीषण परिस्थिती असल्याचे दिसून येत आहे येथील एकही अधिकारी, कर्मचारी हा मुख्यालयी हजर राहत नाहीत सर्वच दररोज अप, डाऊन करतात त्यांच्यावर कुणाचाही वचक राहिला नाही. विद्युत विभागात अनेक तांत्रिक बिघाड वाढत चालले आहे.त्याकडे अधिकाऱ्याचे कोणतेही लक्ष नाही.फक्त खुर्चीवर बसून दिवस काढण्यात या विभागाचे अधिकारी कर्मचारी मश्गूल असल्याचे दिसून येत आहे. रोहित्र खराब होणे, फ्यूज उडणे असे प्रकार नित्याचे झाले आहेत. देखभाल, दुरुस्ती योग्यरित्या होत नसल्याने हा प्रश्न निर्माण झालेला आहे. कंपनीचे अधिकारी याविषयी अजिबातच गंभीर नाहीत. त्यामुळे कर्मचारीही बिनधास्त आहे. नागरिकांनी केलेल्या तक्रारी दुर्लक्षित केल्या जात असल्याचे तालुक्यांतील नागरिकांच्या तक्रारी आहेत. नांदगाव खंडेश्वर शहरासह तालुक्यात दिवसभरात वीजपुरवठा केव्हाही खंडित होतो. त्यामुळे विजेवर चालणारी उपकरणे चालत नाही. घरातील मंडळींना गर्मीमुळे त्रास होतो. लहान मुले, वृध्द मंडळींच्या आरोग्याचा प्रश्न आहे. शिवाय विजेवर चालणाऱ्या विविध व्यवसायाचाही प्रश्न आहे. सायबर कॅफे, झेरॉक्स सेंटर, कोल्ड्रिक्स, विद्युत साहित्य विक्री आदी व्यवसाय अडचणीत आले असल्याची ओरड होत आहे. नागरिकांनी तक्रारी केल्यास वरूनच वीजपुरवठा बंद असल्याचे उत्तर वीज कंपनीच्या स्थानिक कार्यालयाकडून दिले जाते. फ्यूज उडणे, रोहित्र खराब होणे या समस्येशी वरूनचा काय संबंध, असा सवाल नागरिकांमधून केला जात आहे.

विद्युत कंपनीच्या नांदगाव खंडेश्वर कार्यालयाने या नियोजनाची पार वाट लावली असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिल्या आहेत.शेतकऱ्यांना शेतातील मोटारपंपासाठी केवळ चार तासच वीज दिली जाते. एवढ्या कमी वेळात ओलित करणे प्रत्येक शेतकऱ्याला शक्य होत नाही. अशावेळी पिके धोक्यात येण्याची भीती आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे रोहित्र जळण्याचे प्रकारही घडत आहे.

वीज कंपनीचे अधिकारी मोबाइल कॉलला प्रतिसाद देत नाही. त्यांना मुख्यालयाचीही ॲलर्जी आहे. नांदगाव खंडेश्वर,मंगरुळ चव्हाळा, पापड,लोणी टाकळी, जनुना,या वीज केंद्राच्या बाबतीतही नागरिकांच्या तक्रारी आहे. अनेक ठिकाणी खासगी वायरमन कामावर वीज कंपनीचे कर्मचारी कामात गांभीर्य दाखवत नाही. एखादा खासगी वायरमन ठेवतात. त्यांच्याकडून कामे करून घेतात. खासगी वायरमन कुशल राहात नसल्याने त्यांना अपघात होतो. मात्र वीज अभियंतेसुद्धा या विषयावर गांभीर्याने लक्ष देत नाही. अशा घटनांना आळा घालायचा असल्यास अधिकाऱ्यांवरही कारवाई केली पाहिजे, असा सूर नागरिकांमधून उमटत आहे. याबाबत विद्युत विभागाचे अधिकारी कमालीचे उदासीन दिसून येत आहेत त्यांना नागरिकांच्या या समस्येशी काही देणेघेणे नसल्याचे दिसून येत आहे ते सुद्धा अप डाऊन करण्यात व्यस्त आहेत याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

# माध्यमिक शिक्षकांचे क्षमतावृद्धीचे प्रशिक्षण संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी संपूर्ण देशभरात विविध टप्प्यावर करण्यात येत आहे. त्याअंतर्गत महाराष्ट्रामध्ये हे धोरण पूर्णपणे लागू करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती तसेच पंचायत सामिती भातकुली यांच्या संयुक्त विद्यमाने ५ दिवसीय तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणचा चौथा टप्पा दिनांक १८ ते २२ मार्च दरम्यान जि.प.माध्यमिक कन्या शाळा कॅम्प अमरावती येथे आयोजित करण्यात आला होता.

तालुकास्तरीय प्रशिक्षणात ८ तज्ज्ञ मार्गदर्शकांनी तालुक्यातील माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक अशा ऐकून १०० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थिना प्रशिक्षण देले . यात जिल्हा परिषदेचे व खासगी माध्यमिक शिक्षकांचा समावेश होता. जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी हे तालुकास्तरावर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य करीत आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्वाचे बदल पोहोचविण्याचे काम केले जात आहे. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन कार्यनिती, क्षमता आधारित प्रश्न निर्मिती कौशल्ये, विचार प्रवर्तक प्रश्न, समग्र प्रगतीपत्रक इत्यादी विषयावर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.

गटशिक्षणाधिकारी दिपकजी कोकतरे साहेब यांच्या मार्गदर्शनात चंद्रकांत कडबे हे या प्रशिक्षणाची समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळत होते.

तालुकास्तरीय प्रशिक्षणात पंकज हिरोडे, श्वेता पांडे, सुनिल ढोणे, संजय गेडाम, राजेन्द्र ढाकरे , भावना खांडे, संदिप भटकर, निलेश चाफलेकर यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पाडली.

# राष्ट्रीय लोकअदालतीत १३,६०९ प्रकरणांचा निपटारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

जिल्हा व सत्र न्यायालय,अमरावती येथे शनिवारी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाभरात दाखल प्रकरणांपैकी एकूण १३ हजार ६०९ प्रकरणांचा निपटारा यावेळी करण्यात आला. या माध्यमातून एकूण २३ कोटी ४९ लाख ४३ हजार ३२५ रूपये तडजोडीच्या रकमेच्या प्रकरणांचा न्यायनिवाडा झाला.

राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाई, दिवाणी व फौजदारी प्रकरणे, बँकेचे प्रलंबित प्रकरणे, विवाहसंबंधी कायद्याचे दावे व इतर दिवाणी प्रकरणे तडजोडीकरिता ठेवण्यात आली होती. लोकअदालतीमध्ये ठेवलेल्या प्रकरणांची पुर्तता करण्यासाठी संपुर्ण जिल्हयात एकूण ४८ मंडळांची निर्मिती करण्यात आली होती. जिल्हाभरातून एकूण २८ हजार ४१० दाखलपूर्व प्रकरणांपैकी ८ हजार ६०८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. तसेच १५ हजार ९१३ प्रलवित प्रकरणांपैकी २ हजार ३७३ प्रकरणांचा निपटारा झाला. याशिवाय १७ ते २१ मार्चपर्यंत विशेष

मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गतही २ हजार ६२८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. अशाप्रकारे एकूण १३ हजार ६०९ प्रकरणांचा निपटारा या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये करण्यात आले.

# साक्षरा शाळेच्या विद्यार्थ्यांनी गिरवले पक्षी संवर्धनाचे धडे : वन्यजीव दिना निमित्त १००० जल पात्र वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

जागतिक चिमणी दिन आणि वन्यजीव दिनानिमित्त, वन विभाग, अमरावती आणि युद्ध संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, शुक्रवारी स्थानिक साक्षर शाळेत उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील आणि युद्ध संस्थेचे अध्यक्ष नीलेश कांचनपुरे यांच्या हस्ते उपस्थित विद्यार्थ्यांना जल पात्र वाटण्यात आले. कार्यक्रमात वन अधिकारी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पक्षी संवर्धनाविषयी माहिती दिली. वनसंपत्ती वाढविण्यात पक्ष्यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. विद्यार्थ्यांना पक्ष्यांसाठी खाद्य बनवण्याबद्दल माहिती देण्यात आली.

वन्यजीव दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात, विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनात योगदान देण्याची प्रत्येकाची जबाबदारी मोठ्या उत्साहाने समजून घेतली. उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील म्हणाले, निसर्गात मुक्तपणे विहार करणारे विविध पक्षी हे निसर्गाच्या संतुलित साखळीतील महत्त्वाचे घटक आहेत. विविध फळांच्या बिया त्यांच्या विष्ठेतून पसरून एक



नैसर्गिक लागवड साखळी तयार करतात. निसर्गाने स्वतःसह सर्वांची काळजी घेतली, परंतु मानवी इच्छांमुळे ही साखळी खंडित झाली. ही साखळी टिकवून ठेवण्यात पक्षी महत्त्वाची भूमिका बजावतात. कार्यक्रमात वन संवर्धनासाठी वृक्षारोपण आणि पक्षी संवर्धनाचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थ्यांच्या अनेक जिज्ञासू प्रश्नांची उत्तरेही दिली. यावेळी सहाय्यक उपवनसंरक्षक ज्ञानेश्वर देसाई, प्राध्यापक कविता केवतकर, मानद वन्यजीव संरक्षक डॉ. जयंत वडतकर, हेल्प फाउंडेशनचे रत्नदीप वानखडे, सर्पमित्र राघवेंद्र नांदे यांच्यासह साक्षरा शाळेचे सर्व शिक्षक आणि ३५० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

### वाढते औद्योगिकीकरण पर्यावरणासाठी धोकादायक

वाढत्या शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जंगले सतत नष्ट होत आहेत. परिणामी झाडे, पक्षी, प्राणी आणि मानव यांचे जीवन धोक्यात आले आहे. जंगले नष्ट होत आहेत, पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. जागतिक तापमानात वाढ झाल्यामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या उद्भवली. याशिवाय पक्ष्यांची संख्याही झपाट्याने कमी झाली आहे. पक्षी आणि प्राण्यांना आवश्यक असलेला निवारा किंवा अन्न मिळत नाहीये. म्हणूनच, पाण्याचे भांडे किंवा विविध पाण्याची उपकरणे उपलब्ध करून देण्याबरोबरच विज्ञानाचा वापर करून पक्ष्यांसाठी कृत्रिम घरटे कशी तयार करावीत याचा विचार करणे आवश्यक आहे. समाजातील लोकांना याबद्दल जागरूक करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. जर समाजातील प्रत्येक व्यक्तीने हे लक्षात ठेवले आणि त्यानुसार कृती केली तर आपण पर्यावरणाचा होणारा ऱ्हास निश्चितच थांबवू शकतो.

**– धैर्यशील पाटील, उपवनसंरक्षक**

### स्वत:पासून सुरुवात करा

जंगले आणि पक्ष्यांचे संवर्धन करूनच आपण निसर्गात संतुलन साधू शकतो. उन्हाळ्यात, नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडल्यामुळे पक्ष्यांना पाणी शोधण्यात अडचणी येतात. तहानलेले पक्षी पाण्याच्या शोधात शहरात येतात. अशा वेळी पक्ष्यांना पाणी उपलब्ध करून दिले तर डिहायड्रेशनमुळे होणारे त्यांचे मृत्यू रोखणे शक्य आहे.

**– कविता केवतकर, प्राध्यापिका, साक्षारा स्कूल**

# पश्चिम विदर्भातील धरणांमध्ये निम्म्यापेक्षा कमी पाणीसाठा

## पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याची परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अमरावती : उन्हाळ्याचे आणखी अडीच महिने शिल्लक आहेत. मात्र, मार्च अखेरीस अमरावती विभागातील मोठी धरणे निम्म्याच्याही खाली गेली आहेत. ९ मोठ्या प्रकल्पांमध्ये अवघा ४५.६७ टक्के पाणीसाठा राहिलेला आहे. यामुळे नागरी वस्त्यांसह पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याची परिस्थिती गंभीर बनण्याची शक्यता आहे. विभागातील मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये ४२.७६ टक्के पाणीसाठा आहे.

यंदा पुरेसा पाऊस होऊनही मार्चअखेर अनेक शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा खालावला आहे. ९ मोठ्या प्रकल्पांमध्ये ४५.६७ टक्के म्हणजे ६३९.३६ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आहे. मागील आठवड्यात या मोठ्या धरणांमध्ये ६६२ दशलक्ष घनमीटर जलसाठा होता. त्यात आठवडाभरातच २३ दशलक्ष घनमीटरची घट होऊन ६३९ दशलक्ष घनमीटर साठा शिल्लक आहे. मोठ्या प्रकल्पांपैकी बेंबळा, काटेपूर्णा प्रकल्पांमध्ये ४० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा आहे.

अमरावती विभागात एकुण नऊ मोठे प्रकल्प अमरावती जिल्ह्यातील अप्परवर्धा जलाशयात अद्याप ५२.८९ टक्के जलसाठा शिल्लक असला, तरी पश्चिम विदर्भातील इतर जिल्ह्यांतील मोठ्या प्रकल्पांतील जलसाठा कमालीचा घटला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पूस, अरुणावती व बेंबळा प्रकल्पात अनुक्रमे ४६.८२ टक्के, ४३.१५ टक्के, ३७.४० टक्के जलसाठा शिल्लक आहे. अकोला जिल्ह्यातील वान प्रकल्पात ५४.६९ टक्के जलसाठा असला, तरीही काटेपूर्णा प्रकल्पात केवळ ३१.८५ टक्केच पाणी शिल्लक आहे. बुलडाणा जिल्ह्यात गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवली होती यंदा स्थिती बरी आहे. बुलडाणा जिल्ह्यातील नळगंगा जलाशयात ५५.५८ टक्के, पेनटाकळी प्रकल्पात ५२.२४ टक्के जलसाठा आहे. खडकपूर्णा प्रकल्पात १५.१४ टक्के पाणीसाठा आहे.विभागातील २७ मध्यम प्रकल्पांमध्ये ३७१ दलघमी म्हणजे ४८.०८ टक्के जलसाठा आहे, तर २५३ लघु प्रकल्पांमध्ये ३१६.१८ दलघमी म्हणजे ३३.९७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. उन्हाच्या झळा आता जाणवायला लागल्या असून वाढत्या उष्णतामानामुळे बाष्पिभवनाचा वेग वाढला आहे. सिंचनासह घरगुती वापराच्या पाण्याची मागणी वाढली आहे. अमरावती जिल्ह्यातील एकूण ५६ प्रकल्पांमध्ये ५०.६२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. यवतमाळ जिल्ह्यातील ७४ प्रकल्पांमध्ये ४१.२७ टक्के, अकोला जिल्ह्यातील ३० प्रकल्पांमध्ये ३८.९३ टक्के, वाशीम जिल्ह्यातील ७८ प्रकल्पांमध्ये ३३.७० टक्के तर बुलढाणा जिल्ह्यातील ५१ प्रकल्पांमध्ये ३७.८३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

उन्हाळ्यात नागरिकांना पाणी कपातीची चिंता भेडसावू लागते. गेल्या वर्षी पाऊस चांगला झाला व विभागातील शहरांना पाणीपुरवठा करणारी धरणे काठोकाठ भरली होती. ऑक्टोबरच्या अखेरीस धरणांमध्ये ९७ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे पाण्याची वर्षभराची चिंता मिटली असे वाटत होते. मात्र आता मार्च महिन्याच्या अखेरीस धरणांतील पाणीसाठा निम्म्यावर आला आहे. पुरेसा पाऊस सुरू होईपर्यंत याच पाणीसाठ्यावर विभागातील शहरांची मदार असणार आहे.

# नया अकोला चांदूरबाजार महामार्गावर असलेल्या निंबाच्या झाडांना भिषण आग




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नया अकोला**

नया अकोला चांदुरबाजार महामार्गावर अज्ञात व्यक्तीने शेतातील कचऱ्याला आग लावल्यामुळे रस्त्याच्या बाजूला असलेल्या पाच कडुनिंबाच्या झाडांनी मोठा पेट घेतला आग इतकी भीषण होती की वलगाव नया अकोला चांदूरबाजार महामार्गावरील वाहतूक अर्ध्या तासासाठी ठप्प झाली होती अनेक दुचाकी चालकांना व चार चाकी चालकांना आगीचा मोठा फटका बसला आहे हि सर्व बाब वलगाव पोलीसांना माहित पडताच वलगाव पोलिसांनी तात्काळ अग्निशामक दलाला माहिती दिली अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणली.

# यवतमाळ येथील उच्च विद्याविभूषित प्राध्यापकाची मालगाडी खाली आत्महत्या

## मृतदेहाजवळ सुसाईड नोट मिळाल्याने उडाली खळबळ : लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयात होते इंग्रजीचे विषयाचे प्राध्यापक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धामणगाव रेल्वे**


यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील चौपन्न वर्षीय प्राध्यापकाने मालगाडी खाली रेल्वे स्थानकाजवळ आत्महत्या केल्याची घटना येथील रविवारला (ता.२४) रात्रीला दोन ते अडीच वाजताच्या सुमारास घडली मृतकाचे नाव संतोष उर्फ अप्पा भास्कर गोरे अशी ओळख पटली आहे.मृतकाच्या खिशात सुसाईड नोट सापडल्याचीही माहिती समोर आली आहे.यामुळे खळबळ उडाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार असे की,संतोष उर्फ अप्पा भास्कर गोरे (५४) हे यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते व यवतमाळ येथील दर्डा नगरात राहत होते.धामणगाव रेल्वे स्थानकाजवळ अप बाजूच्या प्लॅटफॉर्म जवळील पोळ क्रमांक ७०८/९ जवळ रविवारला (ता.२४) रात्रीला दोन ते अडीच वाजताच्या सुमारास मालगाडी खाली आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. मृतदेहाजवळ सुसाईड नोट सापडल्याचीही माहिती समोर आली आहे.बडनेरा रेल्वे पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मृतदेह उत्तरीय तपासणी करीता येथील ग्रामीण रुग्णालयात आणला.दरम्यान मृतकाचे नातेवाईक फिर्याद नोंदविण्यासाठी बडनेरा येथे गेले आहे.अधिक तपास रेल्वे पोलीस करीत आहे.मृतकाच्या खिशात सुसाईड नोट सापडल्याचीही माहिती समोर आली आहे.यामुळे खळबळ उडाली आहे.मृतकाच्या पश्चात पत्नी,एक मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.संतोष उर्फ अप्पा गोरे यांच्या पत्नी संमोहिनी गोरे ह्या पुणे येथे नातेवाईकांची तब्येत पाहण्यासाठी गेल्या होत्या.

# उद्याला स्व.सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती पुरस्कार वितरण

## मा.आमदार प्रवीण पोटे पाटील, सुदर्शन गांग (जैन), श्रेयस पोटे पाटील, डॉ.रमेश अंधारे, श्रीमती अनुपमा उजगरे, मुंबई यांची उपस्थिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**


मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट,अमरावती यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या २०२४ च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक व विचारवंत डॉ.रमाकांत कोलते यवतमाळ यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानीत करण्यात येत आहे.या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा पुरस्कार अमरावती येथील श्री विशाल मोहोड यांच्या 'कीड' या कादंबरीला देण्यात आला आहे तर उत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार जालना येथील श्री प्रभाकर शेळके यांच्या'डबल ढोलकी' या कथासंग्रहाला मिळाला आहे. श्री तीर्थराज कापगते यांच्या 'मावळत्या गावाचे गाणे'या कवितासंग्रहाला उत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी पुरस्कार जाहीर झाला असून संमिश्र विभागात वैचारिक वाड्.मयासाठी श्री विनोद राऊत,वर्धा यांच्या 'नामदेव ढसाळ यांची कविता:आस्वाद आणि चिकित्सा'या समीक्षा ग्रंथाची तर ललित वाड्.मयासाठी मुंबई येथील विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम 'या ग्रंथाची निवड झाली आहे. तर बालवाड्.मय प्रकारात गोवा येथील श्री रमेश वंसकर यांच्या 'वार्या वार्या आंबे पाड' या बालकाव्यसंग्रहाला व सर्व साहित्यकृतींना पुरस्कृत करण्यात येईल.

माजी राज्यमंत्री व विद्यमान आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या ट्रस्टच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून मराठी साहित्यातील विविध लेखन प्रकारासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्याचा मानस केला होता.पुरस्कार वितरणाचे हे अकरावे वर्ष आहे.या पुरस्कार योजनेसाठी प्राप्त झालेल्या ग्रंथांचे मान्यवर परिक्षकांनी परिक्षण केल्यानंतर पुरस्कार समितीच्या सभेत यावर शिक्कामोर्तब करण्यात येऊन पुरस्कारांचे मुख्य आयोजक आमदार प्रवीण पोटे पाटील, श्रेयस पोटे पाटील, समितीच्या संयोजक प्राचार्य डॉ. शोभा रोकडे यांनी पुरस्कारांची घोषणा केली. यावेळी पुरस्कार समितीचे सदस्य प्रा.डॉ.कुमार बोबडे, प्रा.डॉ.पंकज वानखडे, श्री आर.एस.तायडे, श्री संदिप देशमुख,डॉ.मंदा नांदूरकर,ॲड.प्राजक्ता राऊत, उपस्थित होते.सदर पुरस्कारांचे वितरण आज दि.२५/३/ २४ रोजी सकाळी ११ वा. पी.आर.पोटे पाटील ग्रूप ऑफ एज्यूकेशन इन्स्टीटच्यूट,मुख्य कार्यालय सभागृह,कठोरा रोड,अमरावती येथे एका शानदार सोहळ्यात करण्यात येईल.याचवेळी अमरावती जिल्हयातील लेखकांचाही यावेळी प्रमाणपत्र व समृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात येईल.पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. पी. एन. खोडके संचालक, पी. आर. पोटे पाटील ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट, अमरावती तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री सुदर्शनजी गांग, ज्येष्ठ समाजसेवक, मा. डॉ. रमेश अंधारे जेष्ठ साहित्यिक तसेच मा. आमदार प्रवीणभाऊ पोटे पाटील व श्री श्रेयस प्रवीणभाऊ पोटे पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती राहील. तरी सदर पुरस्कार समारंभास अमरावतीच्या साहित्यिक व रसिक वर्गाने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या तसेच समितीच्यावतीने करण्यात येत आहे.

# अवैध धंदे बंद करण्यासाठी चांदूरबाजार पोलीस स्टेशनच्या विरोधात तेरवी विधी होणार

## तेरवीची निमंत्रण पत्रिका सोशल मीडियावर तुफान वायरल
## शहराच्या इतिहासात प्रथमच रावसाहेब घुलक्षे यांचे अनोख आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ चांदूर बाजार**


- शोकसंदेश -
श्री./श्रीमती
अवैध धंदे बंद करा...
आपणास कळविण्यात अत्यंत दुःख होत आहे की, चांदूर बाजार स्थानिक पोलीस प्रशासनाला अवैध धंदे बंद करण्या करिता निवेदन देऊन त्या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे स्थानिक पोलीस प्रशासनाच्या प्रतिकात्मक पुतळ्याचा अंत्यविधी गुरुवार दि. २७/२/२०२५ चांदूर बाजार पोलीस स्टेशन येथे करण्यात आले सदर आंदोलनाची कोणतीही दखल न घेतल्या मुळे पोलीस प्रशासनाच्या प्रतिकात्म पुतळ्याच्या तेरवीचा कार्यक्रम- गुरुवार दि. २७-०३-२०२५ ला करण्यात येत आहे तरी सदर कार्यक्रमाला उपस्थित राहावे हि नम्र विनंती.
- स्थळ - पोलीस स्टेशन चांदूर बाजार
- शोकाकुल - रावसाहेब घुलक्षे

टेलिग्राम वरचांदूर बाजार पोलीस स्टेशन च्या विरोधात अवैध धंदे बंद करण्याबाबत २७ मार्चला तेरवीचा कार्यक्रम होणार असल्याची निमंत्रण पत्रिका सामाजिक माध्यमांवर तुफान वायरल होत आहे भाजपा नेते रावसाहेब घुलक्षे यांनी अनोख आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे दिनांक २७ फेब्रुवारी रोजी पोलीस स्टेशनच्या परिसरात पोलीस प्रशासनाचा प्रतिकात्मक पुतळा जाळून अंतविधी केली होती त्यानंतर तेरवीचा कार्यक्रम करणार असल्याचा ईशारा घुलक्षे यांनी पोलिसांना दिला आहे दिनांक ७ फेब्रुवारी रोजी अवैध धंदे बंद करण्यासाठी ठाणेदार संतोष टाले यांना निवेदन देण्यात आले होते तर निवेदनाची पोलिसांनी दखल न घेतल्यामुळे दिनांक २७ फेब्रुवारीला आंदोलन करण्याचा इशारा दिला होता तर पोलीस प्रशासनाने अवैध धंदे सुरु ठेवण्यासाठी पाठबळ दिला असा आरोप आंदोलनकर्ते भाजपा नेते रावसाहेब घुलक्षे यांनी निवेनातून केला चांदूर बाजार पोलीस प्रशासनाच्या कार्यशैलीच्या निषेधार्थ पोलीस प्रशासनाच्या प्रतिकात्मक पुतळ्याची अंतविधी पोलीस स्टेशन परिसरात दिनांक २७ फेब्रुवारी रोजी रावसाहेब घुलक्षे यांनी केली होती आता २७ मार्च रोजी पोलीस प्रशासनाच्या तेरवींचा कार्यक्रम पोलीस स्टेशन चांदूर बाजार येथे करण्यात येईल असा इशारा भाजपा नेते रावसाहेब घुलक्षे यांनी निवेदन देऊन केला आहे व तेरवी निमंत्रन पत्रिका सुद्धां आंदोलन कर्ते घुलेक्षे यांनी वायरल केली आहे चांदूर बाजार शहरच्या इतिहासत पहिल्यांदाच असे अनोख आंदोलन होणार त्यामुळे याकडे सर्वांच लक्ष लागले आहे व पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे.



**तेरवीच्या निमंत्रण पत्रिकेची चर्चा....**

चांदूर बाजार पोलीस प्रशासनाच्या तेरवीची निमंत्रण पत्रिका सामाजिक माध्यमांवर तुफान वायरल होते आहे भाजपा नेते रावसाहेब घुलक्षे यांनी ही पत्रिका वायरल करून आंदोलन मध्ये निमंत्रीत केले आहे त्यामुळे या पत्रिकेची चर्चा सर्रास सुरु आहे

# 'नमो किसान' योजनेतील शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत

## अन्य योजना व नमो किसानमधील लाभार्थ्यांमध्ये भेदभाव होत असल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४चांदूरबाजार**

'नमो किसान' योजनेतीलशेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत असून, शासनाकडून अन्य योजनेतील लाभार्थी व नमो किसानमधील लाभार्थ्यांमध्ये भेदभाव करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे.महाराष्ट्र शासनाने नुकतेच लाडकी बहीण योजनेचे दोन हप्ते एकाचवेळी महिलांना दिले. त्यानंतर लगेचच शेतकऱ्यांसाठीही पी.एम. किसान योजनेचा एक हप्ता २४ फेब्रुवारी रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला. केंद्राच्या पीएम किसान योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्र्यांनी 'नमो किसान' महासन्मान योजना सुरू केली. यामध्ये पीएम-किसान योजनेसारखेच चार महिन्यांच्या कालावधीत एकूण ६ हजार रूपये मिळतात, केंद्राने लोकसभा निवडणुकीनंतर पीएम किसान योजनेचे हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर नियमीतपणे जमा केले, पण नमो किसान योजनेच्या हप्त्यामध्ये खंड पडला आहे. मागील वर्षातील दोन, तर चालू वर्षातील एका हफ्त्याचे पैसे न मिळाल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत पडला आहे. त्यामुळे नमो किसान महासन्मान योजनेचे हप्ते राज्य सरकारने लवकरात लवकर शेतकऱ्यांना देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. नापीकी, अतिवृष्टी व पिकांना योग्य हमीभाव नसल्यामुळे शेतकरी आधीच संकटाचा सामना करीत आहे. अंज्ञा परिस्थितीत या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांशी दुजाभाव का, असा प्रश्नही शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, राज्यातील अनेक शेतकऱ्यांना १० हजार रुपये मिळाले आहेत; मात्र अजूनही ९१ लाख शेतकरी प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे सरकार लवकरच हा हप्ता पाठवण्याची शक्यता प्रशासनाकडून व्यक्त केल्या जात आहे.

# जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत जिल्हा परिषद सर्व व नगर परिषद सर्व शाळेत नवीन सत्रात पटसंख्या वाढविण्यासाठी मिशन पटसंख्या वाढ शोध मोहीम कार्यक्रम

## जि.प.प्राथमिक शिक्षणाधिकारी यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार व अधिनियम २००९ नुसार १०० टक्के पटनोंदणी होणे आवश्यक आहे. अधिनियम २००९ नुसार बालकांना शाळेत प्रवेशित करुन त्यांना हसत खेळत शिक्षण देणे ही सर्वाची जबाबदारी आहे. शाळेतून दिले जाणारे शिक्षण हे जीवनदायी आहे अशी शिक्षण हक्क कायद्याची फलनिष्पत्ती आहे. दर्जेदार शिक्षणासाठी शासन कटीबद्ध असून प्रत्येक मुल पटावर नोंदविले जाऊन ते नियमित शाळेत येणे, टिकून राहणे व दर्जेदार शिकणे यासाठी राज्यभर विविध स्तर आणि पातळींवर नवोपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.दिनांक २१/२/२०२५ रोजी मा. पालक मंत्री यांनी जिल्हा परिषद सभागृह येथे आढावा सभा घेतली असून जिल्हा अंतर्गत जिल्हा परिषद व नगर परिषदच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या सातत्याने ढासळत असल्याचे खंत व्यक्त केली आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थीनी प्रवेश घेण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले आहेत.सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्याची पटसंख्या कशी वाढेल याबाबत ग्राम स्तरावर उपाययोजना/कृती कार्यक्रम तयार करुन विद्यार्थी पटसंख्या वाढविता येईल यावर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देशित केले आहे.

आजच्या परिस्थितीत असे निदर्शनास येते की, पालक वर्गाचा कल हा आपला पाल्यांची चांगली गुणवत्ता वाढवावी यासाठी प्रयत्नरत असल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषद मधून पटसंख्या वाढ होणे आवश्यक आहे. यासाठी पटसंख्या वाढविण्याबाबत जिल्हास्तरावरुन मिशन पटसंख्या




वाढ ही मोहीम सन जून २०२५ पासून राबविली जाणार आहे. ही मोहीम यशस्वीरित्या होण्याकरिता सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती, अंगणवाडी ताई, व सर्व पर्यवेक्षकिय यंत्रणा यांनी ही मोहीम पूर्ण करुन प्रत्येक शाळेत ५ + वर्षावरील बालकांच्या पालकांचे व शाळाबाहय असलेल्या विद्यार्थ्याच्या पालकांचे समुपदेशन करुन नवीन प्रवेशित बालकांना दाखल करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी नियोजन करण्यात आले.

**मिशन पटसंख्या वाढ शोध मोहीम यशस्वी होण्यासाठी पर्यवेक्षकीय यंत्रणेची कर्तव्यसूची**

**शिक्षक कर्तव्यसूची** १) कुटुंब सर्व्हेक्षण राबवून दाखल पात्र विद्यार्थ्याची यादी तयार करणे.२) अंगणवाडी मध्ये दाखल असलेल्या इयत्ता १ ली च्या प्रवेशासाठी पात्र बालकांची माहिती /यादीअंगणवाडी ताई यांचेमार्फत तपासून घेणे.३) दाखल पात्र तसेच शाळाबाहय विद्यार्थ्याच्या पालकांची सभा आयोजित करुन शासनामार्फत मिळणारे विविध लाभाच्या योजनाबाबत माहिती तथा मार्गदर्शन /समुपदेशन पर सभा आयोजित करण्यात यावी.४) शाळेत विद्यार्थ्यांना मिळणा-या शासनाच्या विविध सेवा सुविधाबाबतचे फलक सार्वजनिक ठिकाणी लावावीत.५) शिक्षणाचा अधिकार अधिनियम कायदा २००९ अन्वये ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना वयानुरुप समकक्ष वर्गात प्रवेश देऊन एकही मुल शाळाबाहय राहणार नाही याची दक्षता घ्यावी.६) माहितीची गुगल लिंक तयार करण्यात आली असुन सर्वेक्षण मध्ये आढळलेल्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्याची माहिती प्रवेश निश्चित झाल्यावर लगेच लिंकवर भरण्यात यावी.